आतील पानात...
३ पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या नावाचा गैरवापर
४ मराठा समाजाकडून लग्नासाठी आचारसंहिता जाहीर
५ श्री सिद्धेश्वर देवस्थान पुरातन मंदिराची भिंतीची पडझड



पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध

RNINO.MAHMAR/2013/57952


पान ८ वर




सोमवार, दि. ३० जून २०२५ | वर्ष : १३ | अंक : १७४ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com


# महायुतीत दोन गद्दार गँग सरकार चालवित आहेत : आदित्य ठाकरे यांची आगपाखड

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यात अनेक विषय आहेत. जे महाराष्ट्रद्वेष्ट्ये आहेत, त्या सत्ताधाऱ्यांच्या चहापानाला जायचं म्हणजे पाप तर आहेच, पण ज्या पद्धतीने महायुती किंवा महाझुठी म्हणजे भाजप आणि दोन गद्दार गँग ज्या पद्धतीने सरकार चालविण्याचा प्रयत्न करत आहेत. या तिघांची तीन दिशेला तोंडे आहेत. त्यांची एकमेकांमध्ये भांडणे आहेत. पालकमंत्रिपदावरून त्यांच्यात भांडणे आहेत. चक्क मुख्यमंत्र्यांसमोर मंत्री भांडत असतात, असा दावा आदित्य ठाकरे यांनी केला.

पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर सरकारने आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकण्याची घोषणा केली.



मंत्री दादा भुसे



आदित्य ठाकरे

पत्रकार परिषदेत बोलताना ठाकरे यांनी दादा भुसे यांच्यावर जोरदार प्रहार केले.

आदित्य ठाकरे म्हणाले, भ्रष्टाचाराचे डाग असलेले अनेकजण मंत्रिमंडळात आहेत. भाजपचे सरकार भ्रष्टाचारी झालेले आहे. त्यातील सर्वांत मोठा घोळ कदाचित घोटाळाही समोर येत आहे. अकरावीच्या प्रवेशासाठी पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. आम्ही यासंदर्भात आंदोलन करण्याची घोषणा केली होती, त्यामुळे कदाचित घाबरून सरकारने अकरावी प्रवेशाची पहिली यादी जाहीर केली असेल, मात्र या यादीत अनेक गोंधळ झाल्याची तक्रार पालकांकडून होत आहेत. त्या यादीत सम ।वेश करण्यासाठी किंवा पसंतीचं कॉलेज मिळण्यासाठी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी भ्रष्टाचार केला आहे, राज्यातील शाळांम ध्ये सक्तीची हिंदी लादण्याचा परिपत्रक ह्याच दादा भुसे यांनी काढले आहे. हेच ते दादा भुसे आहेत की महाविकास आघाडी सरकारच्या काळात मला कृषिखातं नको मला इतर कोणतंही खातं द्या, असे आम्हाला म्हणत होते. याच दादा भुसेंनी मागील अडीच वर्ष एमएसआरडीसी खाते सांभाळलं आहे. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यासाठी त्यांनी हे खाते सांभाळलं होतं, असेही ठाकरे यांनी स्पष्ट केले.

आदित्य ठाकरे म्हणाले, अकरावी प्रवेशाच्या यादीचा घोटाळा, ज्या म हामार्गाला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आले, त्याच महामार्गावर खड्डे पडलेले आहेत, त्याच महामार्गावर नदी वाहत आहे. तसेच पुणे–मुंबई महामार्गावर सुमारे साडेबारा कोटी वाहनांना चुकीची फाईन लावून एमएसआरडीसीने घोटाळा केलेला आहे.

लाडक्या कॉन्ट्रॅक्टरकडून काढलेले पैसे अनेक राजकीय व्यक्तींना फोडण्यासाठी तसेच, पक्षाच्या बळकटीकरणारसाठी वापरले जात आहेत. त्याच भ्रष्टाचारनाथ शिंदेंना सूरत, गुवाहाटी आणि वॉशिंग मशिनमध्ये उडी मारावी लागली होती. भुमरेंच्या ड्रायव्हरने फुकटात पॉपर्टी घेतलेली आहे. मुख्यमंत्र्यांना दिसतं की दिसत नाही. युतीधर्मामुळे त्यांचे हात बांधले आहेत का?. ते हात बांधून बसले आहेत का, असा सवालही आदित्य ठाकरे यांनी केला.



## सारथी संस्थेतील पायऱ्यांवरील पाणी मुरत नाही; अजित पवारांच्या नाराजीवर पीडब्ल्यूडीची धावाधाव

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पुणे दौऱ्यावर होते. यावेळी पवार यांनी सारथी संस्थेची पाहणी केली. यावेळी सारथी संस्थेतील पायऱ्यांवरील कामावरून अजित पवार यांनी नाराजी व्यक्त केली. पायऱ्यांवर लावलेल्या ग्रेनाईटमध्ये पाणी मुरत नाही, यामुळे संस्थेत येणारे नागरिक घसरून पडण्याची शक्यता आहे, यामुळे अजित पवारांनी असे का झाले याची आपल्याला माहिती हवीय असे आदेश दिले.

सारथी संस्थेतील पायऱ्यावर पाणी साचले आहे. अजित पवार यांच्या पाहणीत दिसल्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली, तसेच पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांना तातडीने हे असे का होतेय याची माहिती देण्याचे आदेश दिले. अजित पवारांच्या आदेशांमुळे पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांची पुरती तारांबळ उडाली आहे. लगेचच पीडब्ल्यूडीचे अधिकारी सारथी कार्यालयात पोहोचले त्यांनी या पायऱ्यांची पाहणी केली. याचबरोबर अजित पवारांनी सारथी कार्यालयाच्या कामाचा आढावा देखील मागितला आहे.

## संक्षिप्त

### तुळशीबागेत महिलेची पर्स हिसकाविली

पुणे (जनप्रवास) : तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेची पर्स चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. पर्समध्ये दहा हजारांची रोकड, दागिने असा ७० हजारांचा ऐवज होता. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोंढवा परिसरातील उंड्री भागात राहायला आहे. महिला नातेवाईकांसोबत शनिवारी (२८ जून) खरेदीसाठी आली होती. दुपारी बाराच्या सुमारास महिला तुळशीबागेतील कावेरे कोल्ड्रीग दुकानासमोरील बोळातून निघाली होती. त्या वेळी गर्दीत चोरट्याने महिलेकडील पर्स हिसकावून नेली. महिलेने आरडाओरडा केला. चोरटा गर्दीतून पसार झाला. तुळशीबागेतील विक्रेत्यांनी चोरट्याचा पाठलाग केला. त्यानंतर महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलीस कर्मचारी सुरवसे तपास करत आहेत.

### हातउसने दिलेल्या पैशांच्या वादातून तरुणावर शस्त्राने वार

पुणे (जनप्रवास) : हातउसने दिलेल्या पैशांच्या वादातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना पुणे स्टेशन परिसरात घडली. याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सचिन शिवाजी माने (वय ३०) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी लंब्या नाव असलेल्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माने याने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माने आणि आरोपी लंब्या हे पुणे स्टेशन परिसरात राहायला आहेत. ते किरकोळ कामे करतात. दोघेजण मजुरी करण्यासाठी पुण्यात आले होते. माने याने आरोपीला ४०० रुपये उसने दिले होते. शुक्रवारी (२७ जून) रात्री माने याने आरोपीला ४०० रुपये मागितले. या कारणावरुन माने आणि आरोपींमध्ये वाद झाला. पुणे रेल्वे स्थानक परिसरातील पार्सल ऑफिसजवळ आरोपीने माने याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. माने गंभीर जखमी झाला. पसार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील लोहार तपास करत आहेत.

## लाखोंचे अत्याधुनिक उपचार आता मोफत

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयात पहिली रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. एका ३५ वर्षीय महिलेच्या पित्ताशयाची पिशवी या शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकण्यात आली. खासगी रुग्णालयात लाखो रुपयांचा खर्च होणारी ही प्रक्रिया ससून रुग्णालयात मोफत करण्यात आली. यामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना अत्याधुनिक उपचारांचा मार्ग उपलब्ध झाला आहे. ससूनमध्ये शस्त्रक्रिया विभागाचे नूतनीकरण नुकतेच करण्यात आले. त्यात हा विभाग पूर्णपणे अद्ययावत करण्यात आला असून, रोबोटिक शस्त्रक्रियेची यंत्रणाही बसविण्यात आली. रुग्णालयात ३५ वर्षीय महिला पोटदुखीच्या तक्रारीसह दाखल झाली. डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत तिच्या पोटात पित्ताचे खडे असल्याचे निदान झाले. त्यावेळी तिच्यावर रोबोटिक प्रणालीद्वारे शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महिलेवर ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. रोबोटिक शस्त्रक्रियेची सुविधा सुरू करणारे ससून हे पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव सरकारी रुग्णालय आहे.


रोबोटिक शस्त्रक्रियेसाठी मागील काही महिन्यांपासून ससूनमधील डॉक्टर आणि परिचारिकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी सिम्युलेटरचा वापर करण्यात आला. ही शस्त्रक्रिया डॉ. लता भोईर, डॉ. आशिष चव्हाण, डॉ. सागर कुर्कुरे व डॉ. पूनिमा अग्रवाल यांच्या शल्यचिकित्सक पथकाने केली.

भूलतज्ज्ञ पथकामध्ये डॉ. सुरेखा शिंदे, डॉ. नेहा कांबळे, डॉ. सुजित क्षीरसागर व डॉ. अनुजा यांचा समावेश होता. शस्त्रक्रियेसाठी परिचारिका राजश्री कानडे, उज्वला गरुड, शमा बांदिसोडे आणि साधना धोमसे यांनी मदत केली.

## आई एकविराच्या मंदिरात भाविकांना ड्रेस कोड

जनप्रवास : प्रतिनिधी

पिंपरी– चिंचवड : ठाकरे आणि कोळी बांधवांच आराध्य दैवत असलेल्या आई एकविरा देवीच्या मंदिरात भक्तांसाठी ड्रेस कोड बंधनकारक करण्यात आला आहे. सात जुलै पासून ड्रेस कोड ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. दुकानदार आणि स्थानिकांसाठी देखील हा नियम लागू असणार आहे. याबाबतच आई एकवीरा देवीच्या संस्थानकडून पत्रक काढण्यात आल आहे.





तोकडे आणि अंग प्रदर्शन कपडे घालून आल्यास भाविकाला मंदिरात प्रवेश देणार नाहीत असं संस्थांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. मंदिराचं पावित्र्य राखण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं पत्रकात म्हटलं आहे. ड्रेस कोड पाळणे हे बंधनकारक असल्याचं देखील त्यांनी स्पष्ट उल्लेख केला आहे. महिला, तरुणी, पुरुष, युवक यांच्यासाठी हा नियम लागू असणार आहे.

महिलांना मंदिरात प्रवेश असल्यास त्यांनी साडी, सलवार, कुर्ता किंवा इतर भारतीय पारंपारिक कपडे परिधान करावेत. महिलांचे पूर्ण अंग झाकलेले असावे. हाच नियम तरुणींसाठी देखील आहे. तर पुरुषांनी आणि युवकांनी धोतर– कुर्ता, पायजमा– कुर्ता, पॅन्ट– शर्ट, टी–शर्ट किंवा इतर भारतीय पारंपरिक कपडे परिधान करावेत. पुरुषाचे पूर्ण अंग झाकलेल असावं असं देखील पत्रकात म्हटलं

काय परिधान करू नये

तरुण आणि तरुणींनी शॉर्टस, शॉर्ट स्कर्ट, वेस्टन कपडे, मिनी स्कर्ट, फाटलेली जीन्स, हाफ पॅन्ट किंवा अंग प्रदर्शन करणारे कपडे घालू नयेत. अशी कपडे कुणी परिधान आढळल्यास त्या भक्ताला मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही. ड्रेस कोड हा बंधनकारक आहे. अशी माहिती आई एकविरा देवीच्या संस्थानकडून करण्यात आली आहे.

## दोन हजार रुपयांसाठी तरुणाचा खून करणाऱ्या आरोपींना जन्मठेप

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : दुचाकीचा अपघात झाल्याची बतावणी करुन तरुणाकडे दोन हजार रुपयांची मागणी करुन त्याचा तळजाई परिसरात खून करणाऱ्या दोघांना सत्र न्यायाधीश जे. जी. डोरले यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

सुमीत उर्फ सोन्या सुधीर काळे (वय २१, रा. रविवार पेठ), अक्षय उर्फ भीमा बाळू दिवटे (वय २२, रा. तळजाई वसाहत, पद्मावती) अशी जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्यांची नावे आहेत. रामअवतार बनवारीलाल जाटव (वय १९, मूळ रा. मध्य प्रदेश) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. रामअवतार पुण्यात बांधकाम मजूर म्हणून काम करत होता. १८ मार्च २०१७ रोजी आरोपी काळे आणि दिवटे दुचाकीवरुन मार्केट यार्ड परिसरात निघाले होते. त्या वेळी दुचाकीस्वार रामअवतार याची दुचाकी आडवी आल्याने आरोपी काळे आणि दिवटे हे दुचाकीवरुन पडले. त्यानंतर आरोपींनी रामअवतारला धमकावून दुचाकीवरुन धनकवडीतील वनशिव वस्ती परिसरात नेले. दोघांनी रामअवतारला डांबून ठेवले. त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधला. दुचाकीची नुकसान भरपाई द्या, असे सांगून रामअवतारच्या नातेवाईकांकडे दोन हजार रुपयांची मागणी केली.

## ‘मकोका’ कारवाईत कारागृहातून बाहेर आलेल्या गुंडाकडून पिस्तूल जप्त

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केल्यानंतर कारागृहातून जामीन मिळवून बाहेर आलेल्या गुंडाकडून स्वारगेट पोलिसांनी पिस्तूल जप्त केले. सारसबाग परिसरात ही कारवाई केली.

नरेश उर्फ नब्या सचिन दिवटे (वय २२, रा. सर्व्हे क्रमांक १३३, दांडेकर पूल) असे् अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. दिवटे याच्याविरुद्ध ‘मकोका’ कारवाई करण्यात आली होती. दिवटे हा कारागृहात होता. कारागृहात असताना त्याने न्यायालयाकडून जामीन मिळविला. त्यानंतर तो कारागृहातून बाहेर आला. स्वारगेट पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस हवालदार कुंदन शिंदे आणि दिनेश भांदुर्गे हे सारसबाग परिसरात गस्त घालत होते. त्या वेळी दिवटे हा आदमबागेजवळील रस्त्यावर थांबला असून, त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती शिंदे आणि भांदुर्गे यांना मिळाली.

## भाजपा कोथरुडमध्ये मंडल कार्यकारिणी जाहीर; पद म्हणजे जबाबदारी : ना. चंद्रकांतदादा पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : भारतीय जनता पक्षामध्ये पद म्हणजे जबाबदारी असते. पक्षाकडून आज ज्यांना पद मिळाले, ते जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आहे, अशी भावना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी व्यक्त केली. गेल्या ११ वर्षात पंतप्रधान मोदींजी यांच्या नेतृत्वात देश झपाट्याने प्रगती करीत आहे. जवळपास २५ कोटी जनता दारिद्र्य रेषेच्या वर आली आहे. हे सर्वांपर्यंत पोहोचवावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत भाजपा कोथरुड मध्य मंडलाची कार्यकारिणी आज जाहीर होऊन; मंडल अध्यक्ष निलेश कोंढाळकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पुणे शहर सरचिटणीस पुनीत जोशी, गणेश कळमकर, उपाध्यक्ष नितीन शिंदे, कोथरुड दक्षिण मंडल अध्यक्ष कुलदीप सावळेकर, माजी अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला उपस्थित होते.



ना. चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, भारतीय जनता पक्षामध्ये मिळणारे पद हे केवळ नावापुरते पद नसून ती जबाबदारी असते. ती देत असताना सर्व कार्यकर्त्यांचा विचार होतं असतो. त्यामुळे आज ज्यांना ज्यांना पद मिळाले आहे, त्यांनी पूर्ण करण्यासाठी काम करावे. आपल्याकडे अनेक कार्यकर्ते असेही आहेत, ज्यांचा प्रवास बूथ अध्यक्षापासून सुरू होऊन, केंद्रीय नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे.

ते पुढे म्हणाले की, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्र मोदींचा प्रवास अतिशय दैदिप्यमान राहिलेला आहे. तीन वेळा एका राज्याचे मुख्यमंत्री आणि सलग ११ वर्षे पंतप्रधान पद म्हणून अतिशय प्रभावी काम करत आहेत. पंतप्रधान पदाच्या काळात २५ कोटी जनता दारिद्र्य रेषेतून बाहेर आली. आज आपल्या अर्थव्यवस्थेची तिसऱ्या क्रमांकाकडे झेप सुरु आहे. माननीय देवेंद्रजींच्या नेतृत्वात राज्य प्रगतीपथावर आहे. कालच देवेंद्रजींनी शेतीसाठी कमीदराने वीज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. हे सर्व लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

मंडल अध्यक्ष निलेश कोंडाळकर म्हणाले की, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा राजकीय प्रवास मी जवळून पाहिला आहे. ते जेव्हा मंडल सरचिटणीस होते, तेव्हा मी बूथचा युवा मोर्चा अध्यक्ष अध्यक्ष होतो. मंडल सरचिटणीस ते केंद्रीय मंत्री पर्यंत त्यांनी पक्षाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पडल्या. चंद्रकांतदादा पाटील यांनी ही विद्यार्थी परिषदेपासून ते राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री असा प्रवास आहे. त्यामुळे आपण दोघांचाही आदर्श समोर ठेऊन काम केले पाहिजे, अशी भावना व्यक्त केली.


मोरेश्वर सभागृह
Nishigandha Banquets
17B/3 Near Joshi Railway Museum, Kothrud, Pune 411 038
020 25460269
+91 9156172004
info@moreshwarsabhagruha.com
www.moreshwarsabhagruha.com
Snehal Tamhankar | Swapnali Gokhale (Amit Caterers)

# अग्रलेख : 'कोचिंग'च्या बाजाराला हवा एकात्मिक चाप

गेल्या तीन दशकांत देशातील शिक्षण क्षेत्राचे रूपांतर औद्योगिक क्षेत्रात झाले. या उद्योगातील आर्थिक उलाढालीचे आकडे फुगत आहेत. या शिक्षण उद्योगातील एक प्रमुख घटक म्हणजे कोचिंग क्लास. प्रवेश परीक्षांपासून स्पर्धा परीक्षांपर्यंत सर्व पातळ्यांवर कोचिंग क्लासशिवाय मोठे यश मिळविता येत नसल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले गेले आहे. एवढेच नव्हे तर आता कोचिंग क्लासेस हे महाविद्यालयांच्या ॲडमिशनचे मालकच ठरले असून, त्यांच्या उपकारांवर महाविद्यालयांची ॲडमिशन होऊ लागलेत. यामुळे नामवंत कॉलेजना याचा फटका बसत आहे, तर नावापुरत्या ॲडमिशनमधून कोचिंगच्या रिझल्टवर महाविद्यालयांचा यशाचा डांगोरा सुरू आहे. परिणामी कॉलेजमधील प्राध्यापकांना एकतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची सक्ती नसल्याने दोन-चार विद्यार्थ्यांपुढे तोंड वाजवावे लागते. त्यामुळे तेही शिकविण्याऐवजी 'पिरीयड' पार पाडण्याचे सोपस्कार पार पाडत असल्याचे दिसून येते.

यामुळेच शाळा आणि महाविद्यालयांना समांतर अशी यंत्रणा उभी करीत मोठे झालेल्या कोचिंग क्लासना आणि 'इंटिग्रेटेड क्लास' या गोंडस नावाने प्रचलित झालेल्या एकात्मिक वर्गांना चाप लावण्याची केंद्र सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे. क्लासचे नियंत्रण आणि नियमन यांसाठी केंद्रीय उच्च शिक्षण सचिव विनीत जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समिती उपाययोजना सुचविणार आहे. मात्र, कोचिंग क्लासना चाप लावण्याची भूमिका घेण्याची किंवा उपाययोजना आखण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. गेल्याच वर्षी केंद्र सरकारने कोचिंग क्लाससाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती.

सोळा वर्षांखालील मुलांना कोचिंग क्लासमध्ये प्रवेश न देण्याची अटही सरकारने घातली होती. प्रत्यक्षात त्यातील कशाचीही अंमलबजावणी झाली नाही. त्याच्याही आधी राज्य सरकारने खासगी क्लासवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो अपयशी ठरला. त्यामुळे आता केंद्राने नियमनासाठी पुन्हा पाऊल उचलले आहे. या निमित्ताने कोचिंग क्लास आणि 'इंटिग्रेटेड क्लास' यांची चर्चा ऐरणीवर आली हेही नसे थोडके. देशातील कोट्यवधी मुलांशी संबंधित असलेल्या कोचिंग क्लासकडे खरे तर गांभीर्याने पाहायला हवे.

एके काळी कोचिंग क्लास लावणे कमीपणाचे मानले जायचे; अभ्यासात गती नसलेल्यांसाठी शिकवणीचे वर्ग असल्याचेही मानले जायचे. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, कोचिंग क्लास अपरिहार्य असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले आहे. तसे होण्यात शिक्षण खात्यापासून क्लास चालविणाऱ्यांपर्यंतचे 'अर्थ'पूर्ण संबंध असले, तरी या क्षेत्रातील गैरप्रकार आणि अपप्रवृत्ती दूर करण्यासाठी खूप आधीपासून प्रयत्न व्हायला हवे होते. उशिरा का होईना आता प्रयत्न होतो आहे, हे चांगलेच; परंतु त्याचे यशापयश अंमलबजाणीवर अवलंबून असेल. गेल्या तीन दशकांत देशातील शिक्षण क्षेत्राचे रूपांतर औद्योगिक क्षेत्रात झाले. या उद्योगातील आर्थिक उलाढालीचे आकडे फुगत आहेत. या शिक्षण उद्योगातील एक प्रमुख घटक म्हणजे कोचिंग क्लास. प्रवेश परीक्षांपासून स्पर्धा परीक्षांपर्यंत सर्व पातळ्यांवर कोचिंग क्लासशिवाय मोठे यश मिळविता येत नसल्याचे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले गेले आहे. त्यातूनच या क्लासचे जाळे देशभर विणले गेले. सध्या त्यातील उलाढाल सुमारे साठ हजार कोटी रुपयांची असल्याचे मानले जाते. पुढील पाच वर्षांत ही उलाढाल दीड लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल, असा अंदाज एका अहवालात वर्तविण्यात आला आहे.

इतक्या मोठ्या रकमेच्या या क्षेत्रात अपप्रवृत्तीही बळावल्या असून, प्रश्नपत्रिका फोडण्यापासून निकालात गैरप्रकार घडवून आणण्यापर्यंतच्या घटना घडत आहेत. गेल्या वर्षी वैद्यकीय प्रवेश परीक्षा अशा गैरप्रकारांमुळे रद्द करावी लागली होती. यामध्ये सर्वसामान्य विद्यार्थ्यांची मात्र परवड होते. ती थांबविण्यासाठी कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने नेमलेल्या समितीने याची पूर्तता करायला हवी.

शिक्षण हे ज्ञानदानाचे क्षेत्र असल्याने ते राजकारणापासून मुक्त असायला हवे, अशी अनेकांची भाबडी समजूत असते. प्रत्यक्षात शिक्षण हीदेखील एक राजकीय प्रक्रियाच आहे. शिक्षणासाठी आर्थिक तरतूद करण्यापासून काय शिकवायचे आणि काय शिकवायचे नाही हे ठरविण्यापर्यंत राजकारणच होत असते. एकूणच शैक्षणिक यंत्रणांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न सत्ताधारी करीत असले, तरी शिक्षणावरील एकूण खर्च मात्र वाढविला जात नाही. वास्तविक शिक्षणावरील खर्च ही प्रत्यक्षात भविष्यासाठीची गुंतवणूक असते. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची शिफारस कोठारी आयोगाने केली होती. मात्र, त्याची आजवर अंमलबजावणी झालेली नाही. शिक्षणावर 'जीडीपी'च्या तीन टक्के रक्कमच खर्च केली जाते. त्यामुळे खासगी शिक्षण संस्था वाढत गेल्या. किंबहुना खासगी शिक्षण संस्थांना अनुकूल अशी धोरणे अवलंबली गेली.

राजकीय नेत्यांपासून उद्योगपतींपर्यंत अनेक मंडळी शिक्षण क्षेत्रात उतरली. यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले हे खरे; परंतु यामुळे शिक्षणाला बाजारपेठेतील वस्तूचे स्वरूप प्राप्त होत गेले हेही तितकेच खरे. खासगी संस्थांची नफेखोरीही वाढत गेली. विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे आर्थिक शोषण करून अनेक संस्था मोठ्या झाल्या. खासगी संस्थांच्या आणि कोचिंग क्लासच्या नियमनासाठी सरकारने योग्य धोरणे न आखल्याचा हा परिणाम. आता तर 'इंटिग्रेटेड' भूमिका घेत कोचिंग क्लासचालक शाळा-महाविद्यालयांना दुय्यम स्थान देत आहेत. शिक्षणातील अशा अपप्रवृत्तींना चाप लावण्यासाठी 'इंटिग्रेटेड' म्हणजेच एकात्मिक उपायांची आवश्यकता आहे. तसे नसेल तर अशी महाविद्यालये बंद करून थेट कोचिंग क्लासेसलाच विद्यापीठाच्या अखत्यारीत आणणे उचित ठरेल.

## अंतरंग



### एसटी सुधारणेत प्रवासी केंद्रस्थानी हवा

गाव तेथे रस्ता अन् रस्ता तेथे एसटी, हे एसटीचे समीकरण आता स्वप्नच बनत चालले आहे. सर्वसामान्यांना परवडणारी एसटीची सेवा शहरापासून ग्रामीण भागापर्यंत अव्याहतपणे सुरू असली तरी काळाच्या या चक्रात एसटी महामंडळाला आर्थिक विवंचनेतून जावे लागले. 'प्रवाशांच्या सेवेत' हे ब्रीद असलेली लालपरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील प्रत्येकाला प्रवासाचा आधार वाटते. कोरोना काळात मुंबईतील लोकल बंद करण्याचा निर्णय झाला. त्यावेळी बेस्ट बसेसच्या जोडीला एसटी महामंडळाच्या गाड्या या मुंबईतील गल्लीबोळातून धावत होत्या. औरंगाबाद, जळगावमधील वाहनचालक हे आपले गाव सोडून मुंबईकरांच्या सेवेत होते. त्यामुळे मुंबईकरांना कोरोना काळात नोकरीवर जाण्यासाठी एसटी बसेसचा उपयोग झाला होता, याची जाणीव मुंबईकरांना आहे; परंतु हीच सेवा देणारी एसटी अडचणीत का आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता मुंबईसारख्या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांनासुद्धा आहे.

एसटी महामंडळाची आर्थिक सद्यस्थिती दर्शवणारी एक श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर झाली. एसटीचे एकूण महसुली उत्पन्न, खर्च, कर्ज आणि देयके किती आहेत? याबाबतचा आढावा घेणारी ती श्वेतपत्रिका होती. या श्वेतपत्रिकेत ४५ वर्षांचे अवलोकन करण्यात आले आहे. या ४५ वर्षांपैकी फक्त ८ वर्षेच महामंडळाला काही प्रमाणात नफा झाल्याचे दिसून आले आहे. उर्वरित सर्व वर्षात मोठ्या प्रमाणात तोटा झाल्याचे समोर आले आहे, त्यामुळे हा तोटा का झाला? यावर उपाययोजना काय आहे, याबाबत श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. एसटी महामंडळाने पुढील वाटचालीसाठी काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविलेल्या आहेत. अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. प्रवासी व मालमत्तांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणाली बसवली जाणार आहे. सध्या सवलत नसलेल्या लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी भाड्यात सवलत देण्याचा विचार आहे. तसेच कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याची योजना देखील आहे. त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाच्या ताफ्यात दरवर्षी ५ हजार नवीन बसेसचा समावेश करणे, एसटी ताफ्यात भाडेतत्त्वावरील हायटेक व्होल्वो बसेसचा समावेश करणे, एसटी महामंडळाच्या जागांवर इंधन पुरवठादार कंपन्याकडून महसुली भागीदारी तत्त्वावर खासगी वाहनांसाठी किरकोळ इंधन विक्री केंद्र सुरू करणे, एसटी महामंडळाच्या जागांचा बिओटी/पीपीपी तत्त्वावर विकास करणे, प्रवासी सोयी-सुविधा निर्माण करणे, उत्पन्न वाढीसाठी लक्षांक निश्चित करणे, आदी उपायांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाने तोट्याची पाच महत्त्वाची कारणे या श्वेतपत्रिकेत सांगितली आहेत. त्यात, राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता असल्याचा मुद्दा नमूद केला आहे. उपलब्ध असलेल्या बसेसचे आयुर्मान अधिक असणे आवश्यक आहे. अनिवार्य व तोट्यातील चलन, अनियमित भाडेवाढ, अवैध वाहतूक ही एसटी तोट्यात जाण्यास कारणीभूत ठरली आहे. श्वेतपत्रिकेनुसार, महसूल वाढीच्या काही उपाययोजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामध्ये उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. महामंडळाच्या मालकीच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारण्यात येणार असून, त्यासाठी इंधन पुरवठादारांशी महसूल वाटप करार केले जाणार आहेत. तसेच, महामंडळाच्या मालमत्ता बीओटी किंवा पीपीपी मॉडेलवर विकसित केल्या जाणार आहेत. सी-कॅटेगरी मार्गांचे बी-कॅटेगरीत व बी-कॅटेगरीचे ए-कॅटेगरीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावणे आणि महसूल वाढीसाठी ठोस उद्दिष्टे निश्चित केली जाणार आहेत. एसटी महामंडळाकडे पूर्वी कामगार वर्ग मोठा होता. मात्र आता कामगार वर्ग ७९ हजार आहे. आधी १८ हजार ५०० गाड्या होत्या. पण नंतर काही बसगाड्या मोडकळीस आल्या. गळक्या आणि तुटक्या बसेस रस्त्यावर चालत होत्या. गेल्या १० ते १२ वर्षांत हा ग्राफ कमी होत गेला आहे. नवीन बसेस घेतल्या नाहीत. ३ ते ४ वर्षांपूर्वी जर नवीन बसेस घेतल्या असत्या तर तोटा जास्त झाला नसता, याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळाचा तोटा सुमारे १० हजारांपेक्षा अधिक आहे. तो भरून काढणे कठीण आहे. त्याचे कारण २५ ते ३० हजार बसेस आहेत, त्याच्या जीवावर तोटा भरून काढणार का? हा प्रश्न आहे. ७७ वर्षांचा एसटी महामंडळाचा इतिहास आहे. गेल्या १० ते १५ वर्षांत हळूहळू ग्राफ कमी होत गेल्याचे दिसत आहे. त्यासाठी दर वर्षाला ५ हजार बसेस ताफ्यात आवश्यक आहेत. जेणेकरून एसटी महामंडळ नफ्यात राहील. पुढच्या ३ ते ४ वर्षांत एसटी तोट्यात राहणार नाही, असा विश्वास श्वेतपत्रिकेतून व्यक्त करण्यात आला आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, एसटी महामंडळाला फायद्यात आणताना, मोक्याच्या ठिकाणी असलेले एसटी डेपो हे महामंडळाच्या ताब्यात असावेत. ते खासगी कंपन्यांच्या ताब्यात जाऊ नयेत, ही प्रवाशांची भावना आहे. डेपोची जागा ही खासगी मालकांच्या ताब्यात गेली तर, प्रवासी हे हळूहळू लालपरीपासून पोरके होण्यास सुरुवात होईल. त्यामुळे ग्रामीण भागातील एसटीचे डेपो हे आजूबाजूच्या परिसराचा विकास होण्यास कारणीभूत ठरले होते. एसटीच्या मालमत्तेची ओळख भविष्यात कायम असावी, ही एसटी प्रवाशांची माफक अपेक्षा आहे. ती पूर्ण करण्यात सरकारलाही काही अडचण नसावी.

– सुहास पाटील

# मतदानापासून ८ कोटी लोकांना दूर ठेवण्याचा डाव!

## राजकारण



### – तेजस्वींचा गंभीर आरोप

बिहारमध्ये निवडणूक आयोगाच्या नवीन उमेदवार यादीच्या मागणीवरून वाद निर्माण झाला आहे. बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी यावरून केंद्राला लक्ष्य केलं आहे. निवडणूक आयोगानं मतदार यादीच्या स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन (एसआयआर)बाबत विरोधी पक्षांच्या वाढत्या चिंतेदरम्यान राष्ट्रीय जनता दलचे नेते तेजस्वी यादव यांनी या प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत समान मतदार यादीचा वापर केल्यानंतर अवघ्या एक वर्षानंतर इतक्या व्यापक सुधारणांची आवश्यकता का आहे, असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

२०२४ ची लोकसभा निवडणूक याच मतदार यादीच्या आधारे घेण्यात आली होती. त्यामध्ये जनतेने मतदान केले आणि सरकार स्थापन झाले. आता जर हीच यादी चुकीची असेल, तर याचा अर्थ असा आहे का की, त्यावेळी नियुक्त केलेल्या सहायक निवडणूक अधिकाऱ्यांनी चुकीची यादी तयार केली? त्यामुळे त्या यादीच्या आधारे स्थापन झालेल्या सरकारच्या वैधतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत नाही का, असा प्रश्न तेजस्वी यादव यांनी विचारला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, प्रत्येक विद्यमान मतदाराला वैयक्तिक गणनेचा फॉर्म सादर करावा लागेल. १ जानेवारी २००३ नंतर शेवटच्या यादीत समाविष्ट झालेल्यांना त्यांच्या नागरिकत्वाचा पुरावादेखील द्यावा लागेल.

**केंद्र सरकारवर आरोप**

सध्याच्या मतदार याद्या रद्द करण्याचा आणि सर्व नागरिकांना नव्यानं अर्ज करण्याची गरज असल्याचा निर्णय अचानक घेतला गेला आहे. त्यामुळे भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए सत्तेत आल्याच्या निवडणुकांच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होते. ही प्रक्रिया केंद्राच्या इशाऱ्यावर केली जात आहे. भाजपा आणि त्यांचे सहयोगी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील जनता दल विधानसभा निवडणुकीपूर्वी घाबरून जात आहेत, असे तेजस्वी यांनी म्हटले. बिहारच्या आठ कोटी लोकांना बाजूला सारत नवीन मतदार यादीचा घाट घातला जात आहे, असाही आरोप त्यांनी केला.

तेजस्वी यांनी या प्रक्रियेच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. अशी शेवटची सुधारणा होण्यास जवळपास दोन वर्षं लागली, तर सध्याची प्रक्रिया पावसाळ्याच्या हंगामात काही आठवड्यांतच करण्याचा प्रयत्न केला जात आहे आणि तीही अशा वेळी जेव्हा बिहारला पुराचा धोका आहे. सरकारी कर्मचारी आणि नागरिकांनी पुरातून जीव वाचवावा की निवडणूक आयोगासाठी कागदपत्रं गोळा करावीत, असे तेजस्वी यांनी म्हटले आहे. ही नवीन प्रक्रिया गरीब, दलित, ओबीसी, अल्पसंख्याक आणि तरुण मतदारांना लक्ष्य करणारी आहे. तसेच मतदार यादीला ओळखपत्र जोडण्याच्या सध्याच्या प्रक्रियेत आधार आणि मनरेगा ओळखपत्रेदेखील वैध पुरावा म्हणून स्वीकारली जात नाहीत, असा आरोपही यावेळी तेजस्वी यांनी केला.

पासपोर्ट, जन्मदाखला, एससी किंवा एसटी प्रमाणपत्र यांसारख्या कागदपत्रांव्यतिरिक्त १ जानेवारी २००३ रोजी बिहारच्या मतदार यादीत असलेल्या पालकांच्या नावांचा समावेश हा वैध कागदोपत्री पुरावा मानला जाईल, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

**निवडणूक आयोगाने काय म्हटले?**

आपल्या आदेशाच्या संदर्भात निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, गेल्या २० वर्षांत मतदार यादीत मोठ्या प्रमाणात भर पडण्यासह मते वगळली गेल्यामुळेही मतदार यादीत लक्षणीय बदल झाले आहेत. तसेच जलद शहरीकरण आणि लोकांनी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वारंवार स्थलांतर करणे ही एक नियमित प्रवृत्ती बनली आहे. ज्या मतदारांचे अर्ज २५ जुलैपर्यंत प्राप्त होणार नाहीत, त्यांना यादीतून वगळण्यात येईल. १ ऑगस्ट ते १ सप्टेंबरपर्यंत वगळण्याबाबत आव्हान देता येईल.

**या लोकांना सिद्ध करावे लागेल नागरिकत्व**

तेजस्वी यांनी सांगितले की, ४० वर्षांखालील सुमारे ४.८ कोटी मतदारांना आता एका महिन्याच्या आत त्यांचे किंवा पालकांचे नागरिकत्व सिद्ध करावे लागेल. सुमारे चार टक्के ३९ ते ४० वयोगटातील लोकांना स्वतःचं नागरिकत्व कागदोपत्री सिद्ध करावं लागेल. सुमारे ८५ टक्के २० ते ३८ वयोगटातील मतदारांना किमान एका पालकाचं नागरिकत्व कागदोपत्री सिद्ध कराव लागेल. तसेच १८ ते २० वयोगटातील ११ टक्के मतदारांना दोन्ही पालकांचं नागरिकत्व कागदोपत्री सादर करावं लागेल, असे तेजस्वी यादव यांनी म्हटले आहे.

## पंचांग

विक्रम संवत्– २०८१ आषाढ शके संवत्– १९४७ संवत्सर विश्वावसूनाम अयन– दक्षिणायान मास– आषाढ ऋतु– सौर ग्रीष्म शुक्ल पक्ष तिथि : पंचमी ०९ : ४ : १२ नक्षत्र : मघा ०७ : २० : ३४ योग : सिद्ध १७ : २० : १३ करण : बालव ०९ : २४ : १२ करण : कौलव २१ : ४६ : ५६ सूर्य : मिथुन चन्द्र : सिंह हिजरी सन् – १४४६ मुस्लिम मास – मोहरम तारीख – ४ विशेष कुमारषष्ठी नाथभुजंग महाराज पुण्यतिथी – परंडा (उस्मानाबाद)

## राशी भविष्य...

**मेष** – वेळेत काम पूर्ण न झाल्यामुळे निराश रहाल. नोकरीमध्ये आपल्या कामाचे कौतुक होईल. कुटुंबातील समस्येकडे डोळेझाक करू नका. आर्थिक योग मध्यम राहील.

**वृषभ** – व्यापार, व्यवसायात जबाबदारीने व्यवहार करा. वडिलधाऱ्या लोकांशी वाद होण्याची शक्यता आहे. प्रवासात सावधानी आवश्यक आहे.

**मिथून** – प्रयत्न केले तर अवघड कामातही यश मिळेल. लांबच्या मित्राची गाठ होईल. अचानक झालेल्या लाभामुळे आनंदी रहाल. वेळेचा सदुपयोग करा. व्यापार चांगला चालेल.

**कर्क** – कामकाजात सावधानी बाळगा. वातावरण अनकूल जरी असले तरी आपले काम पूर्ण हेणार नाही. व्यापारात अडचणी येतील. स्थावर मालमत्ता खरेदी करण्याकरिता गडबड करू नका.

**सिंह** – नोकरीत अधिकारी वर्गाकडून सहकार्य लाभेल. काही नवीन योजना आखाल. कौटुंबिक सहकार्याने दिवस उत्साहीत जाईल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**कन्या** – विचारपूर्वक कामे केले तर फायदा होऊन आपली प्रशंसा होईल. व्यापारात प्रतिस्पर्ध्यांवर मात कराल. जीवनसाथीशी वाद होण्याची शक्यता आहे.

**तूळ** – श्रमाच्या कामात यश मिळेल. नवीन संबंध भविष्यात फायदेशीर असतील. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. मुलांच्या कामकाजावर लक्ष द्या.

**वृश्चिक** – अपूर्ण राहिलेले काम वेळेवर पूर्ण होतील. कौटुंबिक प्रगती होईल. थोडे प्रयत्न केल्याने फायद्याचे मार्ग मोकळे होतील. वरिष्ठ लोकांमध्ये प्रतिष्ठा वाढेल. जोखमीचे कामात सावधानी बाळगा.

**धनू** – प्रयत्न व दूरदर्शीपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राही. काही नवीन योजना आखताल. दुसऱ्याची निंदा करणे सोडून द्यावे.

**मकर** – सामाजिक कार्यात सक्रिय रहाल. आशा आकांक्षा पूर्ण होतील. आपल्या प्रयत्नांनी घरगुती समस्या दूर होतील. रागावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ** – व्यवहारात स्पष्टपणा दाखवा. प्रवास शक्यतो आज टाळा. मानसिक त्रास राहणार आहे.कामकाजात मन लागणार नाही. कौटुंबिक समस्येमुळे चिंतेत रहाल.

**मीन** – कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. बुद्धी चातुर्यामुळे आर्थिक स्थितीत वृद्धी होईल. यश, मान, प्रतिष्ठा मिळेल. घरगुती समस्यांकडे दुर्लक्ष करू नका.

## पारावरचा फड



नेहमीप्रमाणे पावसाळी अधिवेशन आज सुरू झाले. तत्पूर्वी पूर्वसंध्येला विरोधकांचे चहापानावर बहिष्काराचे सोपस्कारही पार पडले. ही परंपरा आता मोडितच निघाली आहे. वास्तविक निवडणुकीपुरते राजकारण अन् नंतर सत्ताधारी- विरोधक एकमेकांच्या हातात हात घालून विकासाचे समाजकारण असे समिकरण असायचे. त्यात विकासावर सखोल चर्चा आणि धोरण ठरविण्यासाठी अधिवेशन असायचे. त्यानुसार पटलावर चर्चा न करण्यासारखे विषय व वाद टाळण्यासंदर्भात चर्चेने सलोख्यात भर पडावी यासाठी पूर्वसंध्येला चहापान ठेवण्याची परंपरा आहे. परंतु दुर्दैवाने राजकारणाची पातळी घसरतच चालली आहे. खेळीमेळीचे वातावरण राहिलेच नाही. कमरेखाली शाब्दिक वार अन् वैरत्वाची भाषा सुरू आहे. त्यातच कायदेकानू धाब्यावर बसवत पक्ष फोडाफोडी एकमेकांना संपविण्याची भाषा भयावह आहे. यातून २४ तास सुडाचे राजकारण विकासाला मारक ठरत आहे. विरोधाला विरोध हा एककलमी कार्यक्रम अगदी पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यपालांकडून सुरू आहे. त्यामुळे चहापानाचे सोपस्कार यावर काय फुंकर घालणार ? याबाबत पारावरची चर्चा!

**बाबूराव :** आता पावसाळी आदिवेशन सुरू झालं म्हनायचं.

**पांडूनाना :** व्हय, आन चापानावं भहीष्कार बी झाला की.

**बाबूराव :** पन मला सांग, ह्ये कायमचं भहिष्काराचं ठरल्या परमानं हुतंया तरमग चा पान कशा पायी ठेवत्याती ?

**पांडूनाना :** आरं ती परंपरा हाय.

**बाबूराव :** पन ती मोडायाची बी नवी परंपरा सुरूच हाय की.

**पांडूनाना :** ते बी खराय म्हन. कारन राजकारनात सलोखा हा शबुदच राह्यला न्हाय.

**बाबूराव :** आगदी खरं बोललास बग पांडूनाना. आरं इश्वास, जनतेनं निवडून ज्या क्शाला दिलं ते कुनी पाळतच नाय. फकस्त जनतेच्या नावावं हयेचाच इकास येवडंच ध्येय हाय.

**पांडूनाना :** व्हय, आन हम करेसो कायदा, ईडी फिडीनं ईरोदक संपवायचं हे वरपसनं खालपातुर सुरु हाय. पंतपरदान, मुख्यमंतरी पक्शाचं झाल्याती. मग काय हाडाचं वैर आसल्यागत समदी वागत्याती. चा पानाला कशी कोन येनार?

**बाबूराव :** म्या म्हंतुया च्या पानाचं सोपस्कार बंदच कराय हावत. आन त्यावं हुनारा खरच बी वाचल. न्हाय तर तिजोरी करजानं भरलीया. यातनं तिजोरीवरचा खरच वाचल.


**पांडूनाना :** येडा बिडा हायस का? आसा खरच वाचतुया व्हय ? आरं सत्ताधारी खानारच की.

**बाबूराव :** कसल्या समित्या आन चांदीची ताटं, पाच पाच हजाराचं एकाचं सोन्याचं घास इकासासाटी खात्यात बिचारी खात्यात खावूद्या की.

**पांडूनाना :** व्हय, किती बी करज झालं तरी हुवू दया खर्च!


– अमृत चौगुले

## उपदेश कथा



एकदा वासुदेवानंद सरस्वती एका गावी गेले होते. गावातील एका सात्त्विक बाईने त्यांना विनंती केली की, 'महाराज, आज आपण आमच्या घरी यावे. 'स्वामी तिच्या घरी गेले. बरोबर आलेल्या लोकांशी संभाषण चालले होते. स्वयंपाकघरामध्ये त्या बाईने दूध गरम केले व एका चांदीच्या फूलपात्रामध्ये ओतले. दूध ओतताना त्यावरील साय भांड्यामध्ये पडली. त्याबरोबर तिच्या तोंडून 'अरेरे!' असे शब्द बाहेर पडले परंतु तिने त्यात साखर घातली आणि ते भांडे स्वामींसमोर आणून ठेवले. बराच वेळ झाला तरी स्वामीं दूध प्यायले नाहीत. बाईला वाटले की, दूध गरम असेल म्हणून स्वामींनी ते घेतले नाही पण संभाषण संपले आणि स्वामी परत जायला निघाले तेव्हा बाई म्हणाली, 'महाराज, आपण दूध का घेतले नाही.' स्वामी म्हणाले, 'नाही, मी ते पिऊ शकत नाही, कारण त्यामध्ये साय व साखर आहेच पण त्याबरोबर आणखी काही तरी मिसळले आहे.' बाई म्हणाली, 'छे, नाही महाराज. आणखी काही मिसळले नाही' तेव्हा स्वामी म्हणाले, 'त्यामध्ये अरेरे मिसळले आहे. ते दूध कसे घेऊ?'

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

१७५९ – चार्ल्स ब्लाँडिन याने नायगरा धबधबा आठ मिनिटांत ओलांडला. अमेरिकेतून कॅनडात पोहोचल्यानंतर तो तिकाटण्यावरचा कॅमेरा घेऊन परत फिरला. त्याने प्रेक्षकांची छायाचित्रे घेतली. यावेळी जमलेल्या २५ हजार प्रेक्षकांपैकी बरेच मानसिक ताण असह्य होऊन बेशुद्ध पडले.

१८०५ – मिशिगनला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.

१९०५ – अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी त्यांचा क्रांतिकारक सापेक्षतेचा सिद्धांत मांडला.

१९०८ – तुंगस्का या सैबेरियातील दुर्गम भागात अज्ञात कारणाने स्फोट, १०० किलोमिटर परिसरातील झाडे भुईसपाट. पृथ्वीवर धुमकेतू आदळल्याने हा स्फोट झाला असावा, असे मानतात.

१९३४ – ॲडाल्फ हिटलरने आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना तुरुंगात टाकले वा ठार मारले.

१९३६ – गॉन विथ द विंड ही कादंबरी प्रकाशित.


१९५० – उत्तर कोरियाचे सैन्य दक्षिण कोरियात शिरले. अमेरिकन सैन्य कोरियाच्या दिशेने रवाना.

### फॅशन शोमध्ये कोल्हापुरीने संताप...

इटलीच्या मिलान फॅशन शोमध्ये महाराष्ट्राची अर्थात कोल्हापूरची कोल्हापुरी झळकली. तिची किमत प्राडा या कंपनीने १ लाख इतकी सांगितली. प्राडाने कोल्हापुरीचे डिझाईन चोरल्याने राज्यात संताप व्यक्त केला गेला. मात्र राज्यात अशा अनेक वस्तू आहेत की ज्यांचे महत्व आजही कायम आहे, पैठणची पैठणी, सोलापूरची चादर, रत्नागिरीचा हापूस अशी अनेक उदाहरणे देता येतील की ती त्या गावाच्या नावावरून ओळखली जातात. केवळ त्या नावावरून ती ओळखली जातात असे नसून त्याला विशिष्ट अशी परिस्थीती वैशिष्ट्ये त्यात अंतर्भूत असतात. अशा वस्तूंची नक्कल करून ग्राहकांना फसविण्याचे उद्योग केले जातात. मग तो कोल्हापुरी गूळ असो अथवा कोल्हापुरी मिर्ची यामध्ये सुद्धा ग्राहकांची फसवणूक केली जाते. वास्तविक ग्राहकाला स्वस्त मिळाले असा हेतू नसून यामुळे मूळ व्यावसायिकांचा धंदा यामुळे गलितगात्र होतो. कालांतराने चांगल्या किंवा दर्जेदार वस्तूला ग्राहकसुद्धा या फसवणुकीमुळे मुकतो. तसेच त्या वस्तूच्या लौकिकास देखील मार बसून त्याचे सुद्धा महत्व कमी होते. त्यामुळे भारतात अनेक वर्षापासून ज्या पूर्वापार नामांकित वस्तू मिळत होत्या त्याचे आज महत्व कमी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे डिझाईनची चोरी असो अथवा त्या वस्तूची नक्कल ही कधीही आक्षेपार्ह बाब आहे.

– किरण पाटील, कोल्हापूर

## जन की बात...



### नागरिकांना समाजभान हवे...


भारतीय योग हा वैश्विक आनंदाचे केंद्रबिंदू बनला आहे. योग चिकित्सा मानव जातीसाठी संजीवनी शरीर, मन, विचार आणि कृती उपाय आहे. आजारी पडू नये यासाठी योग करावा. अनेक योगासनामुळे रक्ताभिसरण आणि ऑक्सिजन सर्व अवयवापर्यंत पोहोचतवतो. त्यामुळे शुद्धिक्रिया होते. कार्यक्षमता वाढते. आरोग्याच्या समस्यांवर योग हेच परम औषध योगच शांततेचा मार्ग दाखवू शकतो. तणाव दूर करून आरोग्यही चांगले ठेवतो. प्रगतीसाठी वाटचाल करतो. तणाव दूर करून आरोग्यही चांगले ठेवतो. प्रगतीसाठी वाटचाल करतो रोज यावा साधनेचा योग संपूर्ण जगभर २१ जून हा दिवस योग दिन म्हणून पाळला जातो. आहार-विहार आचार विचारांच्या समतोलातून जीवन सुखी बनविणे हाच योगशास्त्राचा मूलमंत्र आहे. प्रकृती पूर्ववत होण्यासाठीही योग उपयुक्त ठरतो. ज्या व्यक्तिला आपल्या कामात समाधान आहे. ती खरी यशस्वी आहे. स्वतःचा क्रोध अहंकार आणि लोभावर नियंत्रण मिळविणे. हाच खरा विजय आहे. पावित्र्य धैर्य आणि दृढता या तिन्ही गोष्टी यशासाठी आवश्यक आहेत. जीवनात धैर्य सामर्थ्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्वाचे आहे. भगवान महावीर जगातील असा एकमेव महापुरुष आहे ज्याने म्हंटले की, जगा आणि जगू द्या जगामध्ये सर्वात मोठा शत्रू म्हणजे राग आणि सर्वात मोठा मित्र म्हणजे धैर्य. लोकमान्य टिळक महान गोष्टी सहज मिळत नाहीत आणि सहज मिळणाऱ्या गोष्टी महान नसतात. भगवान गौतम बुद्ध अज्ञानामुळे माणूस चुकीच्या मार्गावर जातो. म्हणून ज्ञानाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एआय कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अतिवापर माणसाला बुद्धिमंदत्व आणण्यास कारणीभूत ठरू शकतो. माणसाची विचारशक्ती मंदावू शकते. तेव्हा आभासी जगाच्या मगरमिठीतून वेळीच बाहेर पडा, प्रत्येक गोष्ट पैशात मोजता येत नाही आणि मोजू ही नये. प्रत्येक भाषेला आत्मा संस्कृती ज्ञान आहे. आपण त्यांचे जतन केले पाहिजे. आजच्या जगात इंग्रजी मातृभाषेत इतकीच महत्वाची आहे. इंग्रजी भाषा पूल आहे. सक्षम आहे. आत्मविश्वास वाढविणारी आहे. भाषेचा द्वेष करणे हिताचे नाही. भारतातील ६० टक्के लोक हिंदी भाषा बोलतात. आता शालेय जीवनात मानवतावादाची जोपासना झाली पाहिजे.

छंद म्हणजेच खरं आयुष्य शब्दांनाही पंख फुटावे शब्दांनी उंचे उंच उडावे, पंढरीची वारी म्हणजे भक्ती अनुशासन आणि समर्पण माउलीच्या कृपेमुळे आळंदीत. पाऊसही वारकऱ्यांना सोबत सहभागी झाला पावसाच्या सरीसोबत अखंड नामस्मरण, स्वानंदाची अभिमानाची प्रचिती मानवी जीवन म्हणजे झेप व झुंज यांचा सुंदर संगम आहे.

सी. बी. रानडे, सांगली

### वर्षा पर्यटन जपूणच...

श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटी चोहीकडे अशी



वर्षाऋतूत चोहोकडे आढळणारी विशेषतः डोंगर, दर्यावर आढळणारी हिरवळ पाहण्यासाठी पर्यटकांची एकच गर्दी होत असते. उंचावरून फेसाळणारे धबधबे, महापुरात दुथडी भरून वाहणार्या नद्या यामुळे निसर्गाचे हे रूप अधिकच खुलून दिसते. मात्र निसर्गाचे हे रूप पाहताना युवक हुल्लडबाजी करताना दिसून येत आहेत. महापुरात पुलावरून नदी पात्रात उड्या मारणे, धबधब्याच्या पाण्यात मस्ती करणे किंवा नदीत सुळकी मारणे असे प्रकार सर्रास करताना दिसून येत आहेत. सुळकी मारताना दगड डोक्याला लागून गतप्राण झालेले वृत्त दरवर्षी राज्यातून कुठेना कुठे तरी ऐकावयास मिळते. तर पुराच्या पाण्यात उडी मारल्याने वाहून गेलेल्यांची अनेक उदाहरणे आहेत. तर दुसरीकडे कड्यावर चिखलातून पाय घसरून अपघात झाले आहेत. तर काहीजण पुराच्या पाण्यातून जबरदस्तीने तशीच गाडी घेऊन जातानाचीदेखील उदाहरणे आहेत. तरुणाईचा उत्साह अथवा आनंद समजला जाऊ शकतो मात्र हे अतिरेकी धाडस जीवावर बेतताना दिसत आहे. त्यामुळे वर्षा पर्यटनाचा आनंद लुटा पण जरा जपणूच.

– प्रशांत सोनावणे, सांगली

## पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयास स्वायत्त दर्जा



■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : पुणे विद्यार्थी गृहाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, पुणे या अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा बहाल करण्यात आला. महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून शैक्षणिक स्वायत्तता लागू करण्यात आली असून यासंदर्भातील अकॅडमिक कौन्सिलची बैठक नुकतीच यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीस महाविद्यालयाचे संचालक सुनील रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुस्कर, प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, सर्व विभागप्रमुख, डीन इंडस्ट्री इन्स्टिट्यूट सेल, डीन अकॅडमीक, परीक्षा नियंत्रक, बोर्ड ऑफ स्टडीजचे प्रतिनिधी, शिक्षक प्रतिनिधी तसेच विशेष निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

यासोबतच, निमंत्रित सदस्य म्हणून आयआयआयटी प्रयागराजचे संचालक डॉ. मुकुल सुतावणे, आयआयटी मुंबईच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक डॉ. विक्रम गद्रे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर, रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापिका डॉ. अनुपमा कुंभार, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्समधील सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे संचालक प्रा. डॉ. गुरुदास नुलकर, एआय आधारित मार्केटिंग कन्सल्टंट व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. अमेय पांगारकर उपस्थित होते.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याची बावडा व सराटी येथे जोरदार तयारी

■ जनप्रवास प्रतिनिधी

बावडा : जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा हा इंदापूर शहरातील मुक्काम आटपून (दि. ३०) जून रोजी वडापुरी शेटफळ हवेली, सुरवड ,वकीलवस्ती मार्गे बावडा ता. इंदापूर येथे दुपारच्या विसाव्यासाठी येणार आहे. या अनुषंगाने यंदाच्या वर्षी या पालखी सोहळ्याची प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे. वकीवस्ती ते बावडा या पालखी मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही साईड पट्यावरील धोकादायक गवत अद्यापही काढण्यात आले नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र बावडा यांच्या वतीने वारकर्यांना आवश्यक असणार्या सर्व सोयी सुविधा वकीलवस्ती ते सराटी पालखी सोहळ्या दरम्यान उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये सराटी येथे पालखी मुक्कामाच्या ठिकाणी चोवीस तास ओपिडी चालू राहील. तसेच पाणी शुद्धीकरण तपासणी, हॉटेल तपासणी, करण्यासाठी आरोग्य सेवक, सुपरवायझर यांची नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. जगदगुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्या दरम्यान सराटी येथे खउण सेंटर देखील उभारण्यात येणार असून खाजगी हॉस्पिटल मध्ये १० टक्के बेड हे वारकरी बांधवांच्यासाठी शिल्लक ठेवण्यात येणार असल्याची माहिती बावडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ अभिषेक ताटे यांनी दिली.बावड्यातील पालखी विसाव्याच्या ठिकाणी आकर्षक असा पालखी शामियाना देखील उभारण्यात आलेला आहे.



संत तुकाराम महाराज पालखी विसाव्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आले असून बावडा येथील दुपारच्या विसाव्या नंतर सायंकाळी ठिक ०६ वाजता संत तुकाराम महाराज पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातील शेवटच्या गावी म्हणजे सराटी ता इंदापूर येथे (दि.३०) जून रोजी मुक्कामास असणार आहे. सराटी येथे संत तुकाराम महाराज पालखी विसाव्याच्या ठिकाणी ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छता, पालखी स्थळावर जर्मन सुपर स्ट्रक्चर वाटरप्रुफ मंडपाची उभारणी करण्यात आली आहे.

सराटी ग्रामपंचायतीच्या वतीने संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागताची जोरदार तयारी केली आहे.या पालखी सोबत आलेल्या वारकरी बांधवांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी सराटी ग्रामपंचायत सज्ज झाली आहे.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कडबनवाडी येथे जिप्सी सफारी उपक्रमाचे उद्घाटन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते कडबनवाडी येथील गवताळ प्रदेशामध्ये जिप्सीमधून करण्यात येणाऱ्या सफारी उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. नागरिकांनी या सफारीचा लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी वनसंरक्षक आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक महादेव मोहिते,सहायक वनसंरक्षक मंगेश ताटे, इंदापुरच्या वनपरिक्षेत्र अधिकारी भाग्यश्री ठाकूर आदी उपस्थित होते.



श्री. भरणे यांच्या हस्ते पुणे वनविभागाकडून एकूण ३ जिप्सीधारकांना प्रत्येकी १ लाख रुपयाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले तसेच कडबनवाडी गवताळ प्रदेशाच्या लोगोचे अनावरणही करण्यात आले.

यावेळी कडबनवाडी वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जलभूषण भजनदास पवार, सदस्य दादासाहेब जाधव, सरपंच संगिता गावडे, उपसरपंच कडबनवाडी, ॲड. सचिन राउत, फ्रेंडस ऑफ नेचर क्लब, निमगाव केतकी व त्यांचे सदस्य आणि परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# वाजवणे- औदर रस्त्यावर एसटीबस रुतली खड्यात; गाडी बाहेर काढण्यासाठी लागले दहा तास

■ जनप्रवासतालुका प्रतिनिधी

राजगुरुनगर : खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील सुमारे वीस गावांना तालुक्याच्या ठिकाणी जोडण्यासाठीचा मार्ग असलेल्या वाजवणे- औदर रस्त्याची दुरावस्था झाली आहे. दुरुस्तीअभावी रस्ता दोन्ही बाजूने अरुंद झाला आहे. साईडपट्टयांचे अस्तित्वच नाही आणि रस्त्यावर काही फुटांचे खोल खड्डे असल्याने हा मार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावर शनिवारी (दि.२८) सकाळी आठ वाजता एका एसटी बसचे चाक एवढे खोलवर रुतले की, ते काढण्याकरीता सायंकाळचे सहा वाजले. दहा तास जी गाडी बाहेर काढण्यासाठी घालवावे लागले त्या रस्त्यावरील खड्ड्यांची खोली सुमारे चार फुटांची तर लांबी जवळपास वीस फुटांची आहे, त्यामुळे चाक खड्ड्यांत रुतल्यावर गाडीचा सर्व भाग रस्त्याला टेकला होता.



खरपुड - राजगुरूनगर ही एसटी बस खरपुड मुक्कामावरून सकाळी येत असताना वाजवणे- औदर रस्त्यावर हा अपघात झाला. येताना गाडीत फारसे प्रवासी नसल्याने व चालकाने गाडीचा वेग नियंत्रीत ठेवला असल्याने सर्वजण सुखरूप होते. तरीही खड्ड्यात पावसाचे पाणी साचून राहिल्याने खड्ड्याचा अंदाज आला नाही. मागील वर्षीही येथे हा खड्डा असाच होता. त्यावर माती मुरूम टाकून जुजबी दुरुस्ती त्यावेळी केली होती. परंतु आताच्या पावसाने खड्डा पुन्हा उघडा पडला आहे. गाडी बाहेर काढण्यासाठी अनेक पर्यायांसह चालक, वाहक व स्थानिक ग्रामस्थांना दगडधोंडे टाकुन खड्डा बुजवावा लागला, त्यानंतर महत्प्रयासाने गाडी बाहेर काढली. गेले अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील डांबर निघून गेले आहे. साईडपट्ट्यांचे अस्तित्वच नसल्याने हा रस्ता धोकादायक झाला आहे. या रस्त्यावर सतत रहदारी असते. मोठा अपघात घडण्यापूर्वी या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

# चैतन्य विद्यालयात गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार

■ जनप्रवास वार्ताहार

ओतूर : येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार थाटामाटात संपन्न झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

दरवर्षी ग्रामविकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयाच्या वतीने एसएससी परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा यथोचित सत्कार समारंभ आयोजित केला जातो. यावर्षी संस्थेच्या व शाळेच्या वतीने हा समारंभ आज अत्यंत दिमाखात संपन्न झाला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे होते.

यावेळी संस्थेचे खजिनदार रघुनाथ तांबे, सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, संचालक रोहिदास घुले, शांताराम पानसरे, संजय वल्हवणकर, नितीन तांबे, अमोल डुंबरे, अशोक अहिनवे, भिवाजी माळवे, इंदुमती डुंबरे, सीमा तांबे, शरद माळवे,संजय हिरे, मधुकर मोरे, कैलास वारुळे, लहू भालेराव, सुनील चौधरी, शुभांगी हांडे, सचिन पानसरे आदि पदाधिकारी व पालक वर्ग, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रविण मानेंचा भाजप पक्ष प्रवेश निश्चित

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : राज्यातील राजकीय समीकरणे सतत बदलत असताना इंदापूर तालुका देखील राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. इंदापूर तालुक्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रथमच तिरंगी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकामध्ये महायुती एकत्र लढल्यास क्रिडा मंत्री दतात्रय भरणे आणि प्रविण माने एकत्र येऊन निवडणूक लढविणार असे देखील बोलले जात आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणूक निकालानंतर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षातून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार प्रवीण माने भाजपमध्ये प्रवेश करणार हे आता निश्चित झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर माने यांच्या पक्षप्रवेशावर शिक्कामोर्तब झाले आहे. दि.२ जुलै रोजी मुंबई येथील पक्ष कार्यालयात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,आणि प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थिती त्यांचा दिमाखदार



पक्षप्रवेश सोहळा निश्चित होणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री यांचे अतिशय निकटवर्तीय असलेल्या एका बड्या राजकीय नेत्यानी हि माहिती बोलताना दिली आहे.

प्रविण माने हे भाजपमध्ये गेल्यास इंदापूरच्या राजकारणात अधिक रंगत येणार असून सत्ताधारी राष्ट्रवादीचे नेते क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि प्रविण माने असा परत एखदा तिरंगी सामना इंदापूरकरांना पाहायला मिळेल. भाजपला प्रविण माने यांच्यासारखा तगडा युवक नेता मिळणार असल्याने आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकामध्ये इंदापूर तालुक्यात भाजप आपले वेगळे स्थान निर्माण करू शकते.येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये म्हणजेच काही दिवसातच या संदर्भात इंदापूर तालुक्यात मोठ्या राजकीय घडामोडी होतील,अशी राजकिय स्थिती निर्माण झाली आहे. परंतु याचा राजकीय फायदा मात्र क्रिडा मंत्री दतात्रय भरणे यांनाच होईल असे जानकार राजकीय मंडळी बोलत आहेत.

### मुख्यमंत्री यांचे इंदापूरवर विशेष लक्ष..

**नीरा नरसिंहपूर येथील लक्ष्मी नरसिंह देवस्थान हे मुरव्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कुलदैवत आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्याच्या मातीवर,माणसांवर,आणि जनतेवर वेगळे प्रेम आहे,असे देखील मुरव्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय यांनी सांगितले आहे. राज्यात व देशपातळीवर भाजप मजबूत होत असल्याने पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात देखील भाजप मजबूत करण्याची भूमिका मुरव्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्यान माने यांना भाजप प्रवेशाचे दि. २ जुलै रोजी निमंत्रण दिल्याचे सांगितले आहे.**

**बुधवार दि. २ जुलै रोजी मुंबई येथील पक्ष कार्यालयात माझा पक्ष प्रवेश सोहळ्याचा कार्यक्रम निश्चित झाला आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि आमदार राहुल (दादा)कुल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.**

**मा.प्रविण दशरथ माने, युवा नेते इंदापूर**

## दृष्टीहीनांनी कारचालकांना दाखवला 'डोळस' मार्ग; राउंड टेबल इंडियातर्फे 'बियाँड साइट', या दृष्टीहिनांसाठी अनोख्या कार रॅलीचे आयोजन



■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : हातात स्मार्टफोन, कानावर पडणाऱ्या सूचना, त्यानुसार कारचालकांना चतुरपणाने मार्ग दाखवत, २२ किलोमीटरची रॅली 'डोळस' पूर्ण करत दृष्टीहीन बांधवांनी आनंद साजरा केला. ५० दृष्टीहीन बांधवांनी कारचालकांना गाडी चालवण्याचा मार्ग दाखवत आपण सक्षम आहोत, याची जाणीव करून दिली. 'अपंगत्व म्हणजे असमर्थता नव्हे' हा सामाजिक संदेशही यातून दिला गेला.

निमित्त होते, सामाजिक समावेशकतेला चालना देण्यासाठी राउंड टेबल इंडिया या संस्थेतर्फे दृष्टीहिनांसाठी आयोजित 'बियाँड साईट', या आगळ्यावेगळ्या कार रॅलीचे! नेक्सा-महालक्ष्मी ऑटो येथून निघालेली ही रॅली अमनोरा पार्क, खराडी बायपास, शक्ती स्पोर्ट्स, हयात इन्स्टा, गोल्ड ऍडलॅब चौक, वर्दे सोसायटी, गुंजन टॉकीज, कोरेगाव पार्क, वेस्टीन हॉटेल, मुंढवा चौक, मगरपट्टामार्गे द फर्न क्लब, अमनोरा पार्क येथे समाप्त झाली.

# पिंपळवंडीत भर दिवसा घरफोडी; साडेआठ तोळे सोने लंपास

▪ जुन्नर तालुक्यात दिवसा ढवळ्या घरफोडीचे सत्र सुरू

जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : नागरिकांनो, सावधान! जुन्नर तालुक्यात सध्या दिवसा ढवळ्या घरफोडीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे, विशेषत: शेतात काम करणारे शेतकरी,जेव्हा घराला कुलूप लावून तुम्ही शेतात जात असाल,तेव्हा अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.त्याचे कारण असेच आहे की, जुन्नर तालुक्यात दिवसा रेकी करून, दिवसा घरफोडी करण्याच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे.

दि.२४ जून रोजी पिंपरीपेंढार ( गटवाडी ) ता.जुन्नर येथील अमित दत्तात्रय कुटे त्यांच्या शेतातील घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्याचे मंग(ळसूत्र,राणीहार व पेडंन असे साडेसहा तोळे सोने लंपास केले. त्याच दिवशी एक ते दीड तासाच्या अंतरात,पिंपळवंडी कोकाटेमळा येथील बबन गोविंद कोकाटे यांच्या शेतातील राहत्या घराच्या दरवाजाचे अज्ञात चोरट्यांनी कडी, कोयंडे तोडून घरातील साडेआड तोळे सोने आणि अकरा हजार रूपयांची रोकड लंपास केली आहे. या चोरीच्या वाढत्या घटनांमुळे जुन्नर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये कमालीचे भीतीचे वातावरण पसरले आहे.

बबन कोकाटे हे पत्नीबरोबर पुणे येथे मुलाकडे गेले होते, त्यांची सून विद्या कोकाटे या मंगळवारी दि.२४ रोजी शेतात काम करण्यासाठी गेल्या होत्या.दुपारी एक ते दीड वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी कोकाटे यांच्या घराची कडी कोयंडा तोडून,दिवसा घरफोडी केली.बबन कोकाटे यांची सून विद्या ह्या सायंकाळी साडेपाच वाजता घरी आल्यानंतर सेफ्टी दरवाजाचा कडी,कोयंडा तोडून,घराचा दरवाजा उघडा दिसल्याने,त्यांनी घरात जाऊन पाहिले असता, कपाटाचे लॉकर तोडून कपाटा मधील सोन्याचे मंगळसूत्र,कानातील कुड्या,वेल,अंगठ्या व चेन असे एकूण



साडेआड तोळे सोने आणि अकरा हजार रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरी करून लंपास केले असल्याचे दिसले.तसेच कपाटातील साहित्य घरातच इतरत्र अस्ताव्यस्त टाकलेले दिसले.

चोरीच्या घटनेबाबत कोकाटे कुटुंबीयांनी आळेफाटा पोलीसांत तक्रार दिली आहे.

## संक्षीप्त वृत्त

### सेवानिवृत्त मुख्याध्यापिका प्रमिला शिरतर यांचे निधन



■ जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : आळे (ता.जुन्नर) येथील माऊली पतसंस्थेच्या माजी उपाध्यक्षा व विद्यमान संचालिका तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती प्रमिला बबनराव शिरतर (वय ८२) यांचे वृध्दपकाळाने नुकतेच निधन झाले . त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने कामाचा ठसा उमटवला होता. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी,सुन नांतवडे असा परिवार आहे. जेष्ठ पत्रकार जयवंत शिरतर यांच्या त्या मातोश्री होत.

### उद्योजिका अनघा बारकुले यांचे निधन



■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : कोथरूड येथील उद्योजिका अनघा असीम बारकुले वय ४५ यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सासूबाई व दीर आहेत.मतिमंद भावाची पालनकर्ती म्हणून नवक्षितीज संस्थेत त्या कार्यरत होत्या.संवेदना न्यासाच्या संस्थापिका माधवी गंगापूरकर यांच्या त्या कन्या होत.

### धारदार तलवार बाळगणाऱ्या विरुध्द भिंगार कॅम्प पोलीसांची कारवाई



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, एक इसम सिक्रेट हार्ट कॉन्व्हेट शाळेजवळ अहिल्यानगर येथे तलवारी विक्री करणेसाठी येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली असुन सदर ठिकाणी कारवाई करणेबाबत आदेशित केल्याने पोलीस अंमलदार दिपक शिंदे यांनी दोन पंचाना बोलावुन घेऊन हकीगत समजावुन सांगुन बातमीतील नमुद ठिकाणी सापळा लावला.

थोड्या वेळातच बातमीतील वर्णनाप्रमाणे एक इसम संशतियपणे एक प्लॅस्टीकची गोणी घेवुन सिक्रेट हार्ट कॉन्व्हेट शाळेजवळ भिंतीलगत वडाच्या झाडाखाली संशयित इसमाची झडती घेतली असता त्याचे कब्जात एक लोखंडी धारधार तलवार लाकडी मुठ असलेलो मिळुन आल्याने संशयित इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नावं अमोल महादेव सुडके वय २८ वर्ष रा, सुडके मळा बालिकाश्रम रोड ता. जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगितल्याने सदर इसमा विरुध्द कॅम्प पोलीस स्टेशन गुरनं.–३७३/२०२५ भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीसांची संयुक्त कामगिरी मोटार सायकल सह आरोपीला केली अटक



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : तोफखाना पोलीस स्टेशन गु र नं ६०७/२०२५ बी एन एस कलम ३०५ ब प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी नामे शुभम ज्ञानेश्वर कोडम रा. ईसकॉन मंदिराचे जवळ हे फिटर काम करत असुन त्यांचे गॅरेजमधुन कोणीतरी अज्ञात इसमाने दोन मोटार सायकली चोरी करुन घेवुन गेले असल्याची फिर्यादीवरुन वरील प्रमाणे तोफखाना पोलीस स्टेशनला गुन्हा रजिष्टरी दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचे तपासात तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री आनंद कोकरे यांनी तपास पथकास सुचना दिल्या त्यांचे सुचने वरुन तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सापळा लावुन आरोपी नामे अनिकेत बाबासाहेब कर्जुले वय २३ वर्षे राहणार मोकाशे वस्ती वाणी नगर अहिल्यानगर यास ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी करता त्याने मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन त्याचेकडुन खालील प्रमाणे मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

# श्री भगवान जगन्नाथाचे आ. आशुतोष काळेंनी घेतले आशिर्वाद



■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : संपूर्ण देशात धार्मिक सण–उत्सवाप्रमाणे काढण्यात येणारी श्री भगवान जगन्नाथ यात्रा मागील वर्षीप्रमाणे याहीवर्षी रविवार (दि.२९) रोजी कोपरगावमध्ये काढण्यात आली होती. या रथ यात्रेत आ. आशुतोष काळे यांनी सहभागी होवून सेवा करून श्री भगवान जगन्नाथाचे मनोभावे पूजन करून आशिर्वाद घेतले.

मागील कित्येक शतकापासून ओरिसा राज्यातील जगन्नाथ पुरी येथे भगवान श्री जगन्नाथाची भव्य दिव्य रथयात्रा काढण्यात येते. हा सोहळा साजरा करण्यासाठी देश विदेशातून जगन्नाथ पुरी येथे दरवर्षी लाखो भाविक येत असतात आणि भगवान जगन्नाथाचे दर्शन घेवून आशीर्वाद घेत असतात. परंतु प्रत्येक भक्ताला जगन्नाथ पुरी येथे जाणे शक्य नसल्यामुळे इस्कॉनचे संस्थापक आचार्य एसी भक्तीवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद यांनी भगवान जगन्नाथाची कृपा संपूर्ण विश्वावर व्हावी यासाठी रथयात्रा सुरू केली आहे. त्या पार्श्वभूमीवर कोपरगाव शहरात याहीवर्षी आंतरराष्ट्रीय कृष्णा भावनामृत संघ इस्कॉन कोपरगाव यांच्यावतीने श्रीमान सुंदर चैतन्य प्रभुजी व श्री लक्ष्मीनारायण दास यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात येवून हजारो भक्तांच्या उपस्थितीत श्री. भगवान जगन्नाथाची भव्य रथ यात्रा काढण्यात आली होती.

रविवार (दि.२९) रोजी भगवान श्री जगन्नाथाची महाआरती करून हरे–कृष्ण, हरे–कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे च्या गजरात हि रथ यात्रा तहसील कार्यालय, भाजी मार्केट मैदान, गुरुद्वरा रोड, विघ्नेश्वर चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदान, छत्रपती संभाजी महाराज स्मारक ते साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे स्मारक या मार्गाने काढण्यात आली. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी देखील या रथ यात्रेत सहभागी होवून भगवान जगन्नाथाचा रथ ओढला. श्री भगवान जगन्नाथाचे मनोभावे पूजन करून आशिर्वाद घेतले.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा एक कोटींचा मानहानी दावा न्यायालयाने फेटाळला

■ जनप्रवास वार्ताहार

राहुरी : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब जाधव यांच्याविरोधात दाखल केलेला एक कोटी रुपयांचा मानहानी दावा जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर यांनी फेटाळला आहे.सदर दावा विद्यापीठाच्या वतीने डॉ. उत्तम ज्ञानू चव्हाण, कुलसचिव उपजिल्हाधिकारी सोपान कासार आणि कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथ यांच्या मार्फत दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाची पार्श्वभूमी २०१६ साली डॉ. के. पी. विश्वनाथ यांची कुलगुरूपदी आणि २०१९ मध्ये सोपान कासार यांची कुलसचिव पदी झालेल्या नियुक्तीवरून आहे. या दोघांची पात्रता संशयास्पद असल्याने बाळासाहेब जाधव यांनी शासनाकडे वेळोवेळी पुराव्यासह तक्रारी सादर केल्या होत्या. शासनाच्या चौकशी समितीने देखील संबंधित नियुक्त्या अपात्र असल्याचा अहवाल दिला होता.

या तक्रारीमुळे व संबंधित वृत्त प्रसिद्ध झाल्याने कुलसचिव कासार यांनी द्रेषातून व जाणीवपूर्वक खोटा दावा दाखल केला होता, असा आरोप करण्यात आला. न्यायालयीन सुनावणी दरम्यान विद्यापीठाच्या वतीने सादर करण्यात आलेले पुरावे आणि साक्षीदार विश्वासार्ह ठरले नाहीत, तर जाधव यांच्याकडे मजबूत कागदपत्री पुरावे असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. ...न्यायाधीश श्रीमती माया अ. देशमुख यांनी वादींचा दावा खोटा आणि बेबुनियाद ठरवून तो फेटाळला. या निकालामुळे विद्यापीठ प्रशासनात खळबळ उडाली असून बाळासाहेब जाधव यांना न्याय मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या प्रकरणात जाधव यांचे कामकाज ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. के. एम. देशपांडे यांनी पाहिले.

## कृषि विभागाच्या खरीप हंगाम मोहिमांची यशस्वी वाटचाल : गोसावी



■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणंताबा : राहुरी (प्रतिनिधी):

राहुरी येथील पंचायत समितीच्या भूखंड क्र. ७२८ वरील निवासी व व्यापारी संकुल विकास प्रकल्प सध्या अडचणीत सापडला असून, यासंदर्भातील सुसाध्यता अहवाल व प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची शिफारस माजी खा. प्रसाद तनपुरे यांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या कडे करण्यात आली आहे.

पंचायत समिती, राहुरी यांच्या वतीने ''बांधा, वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर वर्ग १, २ व ३ चे निवासस्थाने तसेच व्यापारी संकुल विकसीत करण्यासाठी सुसाध्यता अहवालास व तांत्रिक मान्यतेसह प्रारूप निविदा मंजूर करण्यात आली होती. मात्र, निविदापूर्व बैठकीत विकसकांनी अटी व शर्ती जाचक असल्याचे सांगत त्या शिथिल करण्याची मागणी केली होती.

दरम्यान, शासनास २० ऑगस्ट २०२१ रोजी सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यामध्ये बांधकाम साहित्य, इंधन दरवाढ, वस्तू व सेवा करात झालेली वाढ यामुळे सध्याचा प्रकल्प आराखडा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, आधी मंजूर करण्यात आलेला सुसाध्यता अहवाल व प्रशासकीय मान्यता रद्द करून नव्याने सुधारित अहवाल तयार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, अशी अधिकृत मागणी माजी खा. प्रसाद तनपुरे यांच्या वतीने करण्यात आली आहे.

## नागवडे इंग्लिश मेडीयम स्कूलची मनस्वी साखरे राज्यात दुसरी



■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : मंथन वेल्फेअर फाउंडेशन यांच्यावतीने घेण्यात आलेल्या मंथन जनरल नॉलेज एक्झामिनेशन २०२४–२५ मध्ये तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे

१) कु. मनस्वी मनोज साखरे – इयत्ता – पहिली, राज्यात दुसरी २) कु. विराट अविनाश नागवडे – इयत्ता – पहिली, राज्यात सहावा – जिल्हात पहिला ३) कु. अवंती अरुण पवार – इयत्ता – दुसरी , राज्यात सहावा – जिल्हात पहिली ४) कु. प्रसन्ना सुर्यभान गोलांडे – इयत्ता – दुसरी , राज्यात आठवा – जिल्हात तिसरी ५) कु. आराध्या संजय कसले – इयत्ता – दुसरी , राज्यात नववा – जिल्हात चौथी

केंद्रात आलेले नंबर

१) कु. समर्थ शिवाजी नागवडे – इयत्ता – पहिली , केंद्रात पहिला

२) कु. राजवीर महेश साळुंखे – इयत्ता – पहिली , केंद्रात दुसरा

३) कु. शिवाज्ञा कपिल नागवडे – इयत्ता – तिसरी , केंद्रात पहिली

४) कु. अंशुमन अशोक गिरमकर – इयत्ता – तिसरी , केंद्रात दुसरा

५) कु. कनक कुंदन धालवडे – इयत्ता – तिसरी , केंद्रात चौथी

६) कु. तनिष्का ज्ञानेश्वर खेतमाळीस – इयत्ता – चौथी , केंद्रात दुसरी

७) कु. उत्कर्षा युवराज कुरुमकर – इयत्ता – चौथी , केंद्रात तिसरी

८) कु. सुस्मित सुजय व्यवहारे – इयत्ता – चौथी , केंद्रात चौथा

९) कु. श्रेयश मधुकर पांडुळे – इयत्ता – आठवी , केंद्रात पहिला

विद्यार्थांची स्पर्धा परीक्षांची लहान वयापासूनच तयारी व्हावी या उद्देशाने विद्यालयामध्ये प्रि प्रायमरी पासूनच मंथन, ओलंपियाड, अबॅकस, एन.एस.इ. यासारख्या स्पर्धा परीक्षांचा नियमितपणे अभ्यास करून घेतला जातो, अशी माहिती यावेळी निरीक्षक एस.पी. गोलांडे सर यांनी दिली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या प्राचार्य नीतु दुलानी मॅडम तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वीतांचे तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, विश्वस्त अनुराधा ताई नागवडे निरीक्षक एस.पी. गोलांडे सर, मुख्याध्यापिका नीतू दुलानी मॅडम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## शेतकऱ्यांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही : सौ. प्रभावती घोगरे



■ जनप्रवास वार्ताहार

राहाता : भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी अलीकडेच शेतकऱ्यांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे राज्यभरातील शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. या वक्तव्याचा शिर्डी विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस नेत्या कृषीभूषण प्रभावती घोगरे यांनी तीव्र शब्दांत निषेध करत शेतकऱ्यांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही केला आहे असे त्यांनी म्हटले आहे

शेतकरी हा देशाचा कणा असून त्याच्या घामाच्या किमतीवर अनेकजण सत्तेच्या खुर्चीत पोहोचले. अशा स्थितीत शेतकऱ्यांचा अवमान करणे हे अत्यंत निंदनीय आहे. हे वक्तव्य फक्त शेतकऱ्यांचा नाही, तर समस्त कष्टकरी वर्गाचा अपमान आहे. आम्ही शांत बसणार नाही. शेतकरीविरोधी प्रवृत्तींचा पर्दाफाश करतच राहू, असे घोगरे यांनी सांगितले.

कोणताही राजकीय दबाव, भीती किंवा स्वार्थ न पाहता आम्ही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवत राहू. ही आमची बांधिलकी आहे आणि लढा थांबणार नाही, असे स्पष्ट इशारा सौ. घोगरे यांनी सत्ताधाऱ्यांना दिला आहे.

# हिंदी सक्तीच्या शासन निर्णयाची शहर ठाकरे शिवसेनेने केली होळी

## महायुती सरकारने मराठी माणसाच्या स्वाभिमानावर केलेला हल्ला शिवसेना खपवून घेणार नाही : काळे




■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : मराठी भाषा ही मराठी माणसाची अस्मिता आहे. शिवसेना सत्तेत असताना आम्ही प्रत्येक शाळेमध्ये मराठी सक्तीची केली होती. परंतु गुजरातच्या शेठजींच्या दावणीला बांधलेल्या राज्यातील महायुती सरकारने हिंदी ही तृतीय भाषा म्हणून इयत्ता १ली ते ५वी साठी सक्तीची केली आहे. हा महाराष्ट्र द्रोह आहे. मराठी माणसाच्या स्वाभीमानावर सरकारने केलेला हा हल्ला शिवसेना अजिबात खपवून घेणार नाही, असा घाणाघात ठाकरे शिवसेना शहर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

दिल्लीगेट येथे शहर ठाकरे शिवसेनेच्या वतीने हिंदीच्या सक्तीच्या शासन निर्णयाची होळी करून आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसैनिकांनी महायुतीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनात काँग्रेस, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस देखील सहभागी झाली. यावेळी काळे बोलत होते. यावेळी कामगार सेनेचे नेते विलास उबाळे, ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष मनोज गुंदेचा, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हा कार्याध्यक्ष अनिकेत कराळे, माथाडी कामगार सेना शहर प्रमुख गौरव ढोणे, युवा सेना विधानसभा प्रमुख आनंद राठोड, सुनील भोसले, विकेश गुंदेचा, व्यापारी सेनेचे महावीर मुथा, अल्पसंख्यांक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अनिस चुडीवाला, शिवसेना आयटी सेलचे सुजय लांडे, सावेडी शिवसेनेचे गणेश आपरे, मिलन सिंग, हाफिज सय्यद, रिक्षा युनियनचे शंकर आव्हाड, केडगाव शिवसेनेचे किशोर कोतकर, युवा सेनेचे किरण लांडे, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे विकास भिंगारदिवे, महिला काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष उषा भगत, महिला उपाध्यक्ष शैला लांडे, शिवसैनिक जयराम आखाडे, दीपक काकडे, श्रीकांत दंडवते, निखिल लाड, अनिकेत लांडे, बाबासाहेब वैरागर, राजेंद्र तरटे, सचिन भालेराव, विनोद शिरसाट आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विना तक्रार पोलिसांनी वाहने पोलीस स्टेशनमध्ये आणली

## वाहन मालकांशी लाखोंची तडजोड झाल्याची चर्चा; श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे आश्चर्यकारक कामगिरी; यामध्ये पोलीस अधीक्षक यांनी लक्ष घालण्याची गरज

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : श्रीगोंदा पोलिसांनी कुठलाही गुन्हा अथवा तक्रार दाखल नसताना आपले कार्यक्षेत्र सोडून बेलवंडी, यवत, पारनेर, शिरूर या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ७ ते ८ दुचाकी, १ फोर व्हीलर,२ ट्रॅक्टर अशी वाहने श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये आणून संबंधित वाहन धारकांच्या मालकांना कारवाई करण्याची धमकी देऊन लाखो रुपयांची तडजोड केली असुन १० ते १२ दिवस उलटूनही अद्याप पर्यंत कुठलीही तक्रार अथवा गुन्हा दाखल नसताना ही वाहने कशासाठी व का आणली अशी खमंग चर्चा श्रीगोंदा तालुक्यात सध्या सुरू आहे. तरी या प्रकरणात पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी लक्ष घालून सखोल चौकशी करून संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**यावाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांना विचारले असता ही सदर वाहने एका विशिष्ट तपासासाठी आणली आहेत त्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येईल व तोपर्यंत कुठल्याही बातम्या प्रसारित करू नका असे सांगितले.**

सविस्तर वृत्त असे की, श्रीगोंदा तालुक्यात दोन पोलीस स्टेशन असून यासाठी स्वतंत्र कार्यक्षेत्र आहे. बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीतील येवती येथील एक व्यक्ती शिरूर जि.पुणे येथील अनेक फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरून मित्र, नातेवाईक व इतर अनेक जणांच्या नावावर परस्पर सुमारे १०० ते १५० अशी ट्रक, ट्रॅक्टर, जेसीबी, दुचाकी, चारचाकी अशी विविध वाहने खरेदी करून त्याची ग्राहक शोधून त्यांना माझ्याकडे फायनान्स कंपनीचा विशिष्ट प्रकारचा सांकेतिक कोड आहे असे सांगून परस्पर त्याची विक्री करत आहे. असेच मागील काही महिन्यांपूर्वी बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीतील ढवळगाव येथील एका मुलाच्या नावावर एक ट्रॅक्टर व







५ ते ६ दुचाकी नावावर घेतल्या होत्या. ही माहिती त्यांना फायनान्स कंपनीचे लोक घरी आल्यानंतर समजले.यांच्याकडे दुचाकी ना ट्रॅक्टर यामुळे ते चक्रावून गेले व आपल्या नावावर गाड्या व ट्रॅक्टर घेऊन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ बेलवंडी पोलीस स्टेशन गाठले.

परंतु बेलवंडी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली.तद्नंतर त्यांनी त्यांचे जवळचे नातेवाईक यांना याबाबत माहिती सांगितली सदरचा नातेवाईक याचे श्रीगोंदा पोलिसांशी लागेबांधे असल्याने आपण श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या कर्मचारी व अधिकारी यांना माहिती देऊ असे सांगून त्यांनी सर्व माहिती श्रीगोंदा पोलिसांना दिली. त्यानंतर श्रीगोंदा पोलिसांनी तक्रार दाखल न करता सुमारे १० ते १२ दिवसांपूर्वी बेलवंडी,यवत, पारनेर, शिरूर पोलीस स्टेशन हद्दीतील काही वाहने जप्त केली तर काही वाहन धारकांना कारवाईच्या नावाखाली दमदाटी करून लाखो रुपयांची आर्थिक तडजोड करून सोडून दिले.

याप्रकरणात जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी लक्ष घालून सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशी चर्चा जोर धरू लागली आहे.

# भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिवताप प्रतिरोध जनजागरण मोहिम

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राहुरी येथे राष्ट्रीय कीटकजन्य व जलजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत हिवताप प्रतिरोध जनजागरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात विद्यार्थिनी, शिक्षक, प्राचार्य व अन्य कर्मचाऱ्यांना गप्पी मासे व डास आळ्यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. डासांची उत्पत्ती, त्यांच्यामुळे होणारे डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया, हत्तीपाय या आजारांविषयी विविध पोस्टरद्वारे माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरेही



देण्यात आली.

या मोहिमे अंतर्गत राहुरी शहरासह संपूर्ण तालुक्यात डासांची उत्पत्ती होणाऱ्या ठिकाणी गप्पी मासे सोडण्यात आले. नागरीकांना घरातील पाणीसाठे झाकून ठेवणे, वाहत्या नाल्यांची स्वच्छता राखणे, खिडक्यांना व व्हेंट पाईपला जाळी बसवणे, झोपताना ओडोमासचा वापर करणे, कुलर मधील पाणी आठवड्याला स्वच्छ करणे, डबक्यांना आळा घालणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.तसेच ताप आल्यास तात्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात तपासणीसाठी यावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दिपाली गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या वेळी श्री. भाऊसाहेब कानवडे (तालुका आरोग्य पर्यवेक्षक), श्री. हर्षल झांबरे (आरोग्य सहाय्यक), श्री. प्रकाश तमनर, श्री. भोसले, श्री. सिन्नरकर, श्री. आवारे (आरोग्य सेवक) यांनी हिवताप व अन्य आजारांबाबत प्रभावी जनजागृती केली.

# मुख्याध्यापक लंके यांची बदली रद्द करा

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेतील पालकांचा संतप्त सूर! पालकांची आपत्कालीन बैठक; संस्थेच्या कार्यकारिणीला निवेदनद्वारे आंदोलनाचा इशारा

■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर : रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विभागाचे कार्यरत मुख्याध्यापक शिवाजी लंके यांची अचानक बदली करण्यात आल्याने शाळेतील पालक वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. संस्थेच्या या निर्णयाविरोधात पालकांनी एकत्र येऊन आपत्कालीन बैठक घेऊन लंके सरांची बदली तात्काळ रद्द करण्याची मागणी केली.



लंके हे गेल्या अनेक वर्षांपासून या शाळेत कार्यरत असून त्यांच्या दूरदृष्टी, काटेकोर प्रशासनशैली, विद्यार्थ्यांप्रती कळकळ, व परिणामकारक नेतृत्वामुळे शाळेने शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात भरीव यश संपादन केले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी राबवलेले उपक्रम, मार्गदर्शन आणि कौशल्यवर्धनाच्या योजना यामुळे पालकवर्ग व ग्रामस्थांमध्ये त्यांच्याविषयी मोठा विश्वास निर्माण झाला आहे.

लंके सरांचं या शाळेत असणं म्हणजे आमच्या मुलांच्या भवितव्यासाठी संरक्षण आहे. त्यांच्या जाण्याने शाळेचा पाया कमकुवत होईल अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या आहेत.

या संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये पालक प्रतिनिधींनी आपल्या भावना मांडत, संस्थेच्या कार्यकारिणीला दिलेल्या निवेदनात, लंके यांच्या बदलीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असून, ही बदली मागे घेण्यात यावी, अन्यथा आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील, अशा इशारा देण्यात आला आहे. तर पालकांनी संघटित पद्धतीने मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

# राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील दत्त लॉन्स येथे विवाह समारंभात तुफान हाणामारी

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील श्रीरामपुर रोड लगत असलेल्या दत्त लॉन्स येथे रविवार दि. २९ जून रोजी एका विवाह समारंभात तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत पाच ते सहाजण गंभीर जखमी झाले असून त्यांना ताबडतोब रुग्णालयात हलविण्यात आले.



राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील एका गावात एक लग्न समारंभ होता. या लग्न सोहळ्यासाठी नगरहून वऱ्हाडी आले होते. या लग्नाची मुलीकडच्या मंडळींकडून जोरदार तयारी सुरू होती. ठरल्या प्रमाणे दि. २९ जून २०२५ रोजी दुपारच्या सुमारास लग्न सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. मात्र यावेळी वधू पक्षातील तरुण आणि वर पक्षातील काही तरुण यांच्यात वाद झाला. सुरूवातीला हा वाद किरकोळ होता. परंतू नंतर या वादाचं रूपांतर बेदम हाणामारीत झाले. लग्नाला आलेल्या पाहुण्यांनी हा वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. मात्र नगरहून आलेल्या वऱ्हाडातील तरुणांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे हा वाद आणखीनच चिघळला. वाद इतका वाढला की लग्न मंडपाला चक्क युद्धाच्या छावणीचं स्वरूप आले होते. कारण शाब्दिक बाचाबाची थेट हाणामारी होईपर्यंत पुढे गेली. आणि वर पक्षातील काही तरुणांना लग्न मंडपातून थेट रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली आहे. जखमी झालेल्या तरुणांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. या लग्न सोहळ्याची तालूक्यात चर्चा सुरु आहे.

# एकरुखे ग्रामपंचायतीच्या लेखी आश्वासनानंतर शिव रस्त्याचे उपोषण माघे

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : तालुक्यातील एकरूखे येथे रामपूरवाडी एकरूखे शिवरस्ता सिमेंट काँक्रेटीकरणाचे रखडलेले काम त्वरीत सुरु करण्या करीता एकरूखे ग्रामपंचायती समोर मंच्छिन्द्र भिका थोरात यांनी अमरण उपोषण सुरु केले होते परंतु एकरूखे ग्रामपंचायतीच्या लेखी आश्वासना नंतर थोरात यांनी आपले उपोषण माघे घेतले आहे .

एकरूखे रामपूरवाडी शिव रस्त्यासाठी उपोषणाचा इशारा देऊन देखील रस्त्याचे काम झाले नसल्याने शनिवारी सकाळी दहा वाजे दरम्यान थोरात यानीं ग्रामपंचायत कर्यालयाच्या आवारामध्ये आपल्या उपोषणास सुरवात केली आसता एकरूखे ग्रामपंचायतिच्या वतीने लगेचच रस्त्यावर मुरमीकरण करण्यात आले व पुढील दोन दिवसांमध्ये त्यावर खडीकरण करु असे लेखी आश्वासन सरपंच जितेंद्र गाढवे यांनी यावेळी दिले .राहाता तहसीलदार यांच्या बरोबर आपण या रस्त्या बाबत चर्चा करुन या रस्त्याचे काम पूर्ण करु असे उपोषण कर्त्यास यावेळी सरपंच गाढवे यांनी सांगितले आहे.

ग्रामपंचायतिच्या वतीने लेखी आश्वासन मिळाल्या नंतर मंच्छिन्द्र थोरात यांनी आपले उपोषण लींबू पाणी घेत सोडले उपोषनार्थीची यावेळी एकरूखे ग्रामीण रुग्णालयातील डॉ. अविनाश सातव यांनी तपासणी केली तर राहाता गुप्त पोलीस विनोद गंभीरे यांनी यावेळी रस्त्याची पाहणी करत उपोषणस्थळी उपस्थित होते .

# कोरियन भाषा शिकल्याने विद्यार्थ्यांना असंख्य संधींची दारे उघडतील

## दक्षिण कोरियाचे मुख्य वाणिज्यदूत यू डोंग-वान यांचे प्रतिपादन; इंडो-कोरियन सेंटरतर्फे कोरियन भाषा वक्तृत्व स्पर्धा

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : ''कोरियन भाषा शिकल्याने भारतीय विद्यार्थ्यांना संधींची असंख्य दारे उघडतील. भारतातील विविध भागांमध्ये असे कोरियन भाषा शिकण्यासंदर्भातील उपक्रम दोन्ही संस्कृतींना एकत्र आणतील. तसेच भारतीय विद्यार्थ्यांना कोरिया-आधारित कंपन्यांमध्ये अनेक संधी मिळवून देतील,'' असे प्रतिपादन दक्षिण कोरियाचे मुंबईतील मुख्य वाणिज्यदूत यू डोंग-वान यांनी केले.

दोन्ही देशांमध्ये प्राचीन काळापासून असलेल्या सांस्कृतिक समानता आणि संबंधांना विविध मंचांद्वारे वाढवण्याची गरज असून, त्यासाठी मुंबईमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे




प्रयोजन असल्याचेही यावेळी सांगितले.

दक्षिण कोरियाच्या सांस्कृतिक, क्रीडा आणि पर्यटन मंत्रालयाच्या अंतर्गत स्थापित इंडो-कोरियन सेंटर संचालित किंग सेजाँग इन्स्टिट्यूटच्या वतीने बालेवाडी येथे कोरियन भाषेतील वक्तृत्व स्पर्धा यू डोंग-वान यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पडली. कोरियन भाषा आणि संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रचार होण्यासाठी अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात. प्रसंगी एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक ही ओके, किंग सेजाँग इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. एउन्जु लिम, इंडो-कोरियन सेंटरचे सहसंस्थापक संजीब घटक आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आमदार संग्राम जगताप यांच्या समर्थनार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने महासभा संपन्न

## लोकसभेचे व्होट जिहादचे उत्तर विधानसभेत हिंदूंनी एकत्रित येऊन दिले : खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : आमदार संग्राम जगताप हे एक हिंदुत्वाचा विचार आहे. त्यांना समर्थन देण्यासाठी आपण सर्वजण एकत्रित आलो आहे. माझ्या संकट काळामध्ये साथ देणारा सच्चा मित्र देखील आहे. अबू आझमीला बोलण्याची परवानगी असेल तर आमदार संग्राम जगताप यांना हिंदुत्वावर बोलण्याचा हक्क आहे. महाराष्ट्रात संपूर्णपणे गोहत्या बंदी झाली पाहिजे आणि महिला सुरक्षित राहिल्या पाहिजे, यासाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. लोकसभेचे व्होट जिहादचे उत्तर विधानसभेत हिंदूंनी एकत्रित येऊन दिले आहेत, आपल्या जमिनी आणि मंदिरे आपल्या नावावर करण्यासाठी संघटित होऊन लढा देण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. मी आता



आमदार संग्राम जगताप यांच्या समर्थनार्थ आयोजित सकल हिंदू समाजाच्या सभेनंतर एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली. ह. भ. प. संग्राम बापू भंडारे, सागर बेग, मंदारबुवा रामदासी, अजिनाथ महाराज पालवे, राजेंद्र जंजाळ आणि रवी पडवळ या मान्यवरांनी स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करत आमदार संग्राम जगताप यांच्याशी चर्चा केली.

हळूहळू हिंदुत्वाकडे चाललो आहे. आणि संग्राम जगताप माझ्यापुढे गेले आहे. आणि त्यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे काम माझे आहे. असे प्रतिपादन खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आमदार संग्राम जगताप यांच्या समर्थनार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने महासभा संपन्न झाली. यावेळी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील, ह भ प संग्रामबापू भंडारे, मंदार बुवा रामदासी अजिनाथ महाराज पालवे, राजेंद्र जंजाळ, रवी पडवळ,भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती अविनाश घुले, आदींसह सकल हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकमेकांच्या गुणांची, भावनांची कदर करा...

वैवाहिक जीवन बळकट काण्यासाठी गरज असते आपल्या जोडीदाराला खूष राखण्याची. पती असो वा पत्नी दोघांनी एकमेकांचे दोष काढण्याऐवजी ते स्वीकारून ते प्रेमाने व संयमाने सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. आपले वैवाहिक जीवन आनंदी राखण्यासाठी काही गोष्टी ध्यानात ठेवा.

एकमेकांना वारंवार टोकू नये. पती-पत्नीने एखमेकांच्या कामात वारंवार दोष काढू नयेत. तसेच टोकाटोकीही करू नये. कारण आता दोघेही परिपक्व असता. वारंवार एकमेकांना टोकणे दोहोंपैकी कोणालाच आवडत नसते. एकमेकांची कार्यशैली वा व्यवहार पसंत नसतील तर ते प्रेमाने सुधारावेत.

आठवड्यातील काही क्षण आपण दोघांनी एकांतात घालावेत. त्यासाठी दोघेच दूर कोठे फिरूनया व त्यावेळी रोमांचकता व आनंद आणील. जर घरी छोटी मुले असतील तर त्यांना सोबत न्या. जर मुले मोठी असतील तर त्यांना काही काळ एकटे राहण्याची सवय लावा. वेळोवेळी एकमेकांना गिफ्ट द्यायला विसरू नका.



सकाळी उठतानाच एखाद्या गोष्टीवरून वाद झाल्यास तो न वाढत्तता लवकरात लवकर संपवावा व राग निवळावा. तो निवळला नाही तर ऑफिसातून फोनवरून आपल्या चुका मान्य करीत बोलावे. यामुळे जोडीदार आनंदून सायंकाळी भेटण्यास आतूर होईल. चूक कबूल केल्यामुळे माणूस छोटा होत नाही तर आपला आदर वाढवतो. एकमेकांना आनंदी काण्यासाठी

आवडती छोटीशी वस्तूही महत्त्वाची ठरते. आपल्या जोडीदाराला त्याच्या आवडीची कोणतीही वस्तू घेऊन द्या व एकमेकांत एवढे समरसून जा की, आपल्याला एकत्र आणणाऱ्या समाजालाही क्षणभर विसरा. सामाजिक सुख-दु:खातही एकत्र राहा.

एकमेकांच्या गुणांची, भानांची कदर करा. जर दोहोंपैकी एखाद्यात काही गुण असेल तर त्याबाबत मत्सर न धरता त्याची नातेवाईकात व मित्रमैत्रिणींत मनमोकळी स्तुती करा. एकमेकांची टर उडवू नका. ■■■

# संसारात पूर्वनियोजन करणे गरजेचे...

प्रत्येक व्यक्ती सुखाच्या पाठी धावत असताना आपल्या मनातील असणाऱ्या विचाराचे स्थान पूर्णपणे विसरुन जात आहे. आणि यामुळे संसारात करावी लागणारी तडजोड कोणत्या प्रकारे करावी व कशी करावी याचे नियोजन पूर्णपणे विसरले जाते आहे. तेव्हा प्रत्येक व्यक्तीने आपल्या संसारात मॅनेजमेंट करुन कोणत्या प्रकारे हा संसार चांगल्या रितीने फुलविता येईल, त्यास बहर येईल अशा रितीने आपण कोणतीही संसारीक गोष्ट करताना त्याअगोदर त्याचे पूर्वनियोजन करणे गरजेचे असते. मात्र, पती-पत्नींनी एकमेकांना विश्वासात घेऊन आपण अशा प्रकारचे नियोजन करु या का ? अशी विचारणा एकमेकांनी एकमेकास केल्यास आणि त्यातून आपले इतर बजेट कुठे फेल तरी जाणार नाही ना ? याचा विचार करुन एकमेकांनी जर प्रश्न सोडविले तर ही अडजेस्टमेंट खूप चांगल्या प्रकारे आपल्या संसारास बळकटी देऊ शकेल. प्रत्येक बाब ही आपले मॅनेजमेंट स्कील वापरुन केल्यास त्याच्यामध्ये बळकटी येऊ शकते. अन्यथा आपल्या संसार प्रपंचामध्ये कुठेतरी प्रगतीला खीळ घालण्यासारखे होऊ शकेल. योग्य वेळी योग्य नियोजन आणि त्यासाठी योग्य कृती हीच गरज असते. म्हणून जीवन जगत असताना संसाराच्या जगात आपण आपल्या पद्धतीने मॅनेजमेंट करुन गरजेचेच असते. ते जर नाही झाले तर इतरांच्या दृष्टीने,शेजारपाजाऱ्यांच्या दृष्टीने, मित्रपरिवाराच्या दृष्टीने नातेवाईकांच्या दृष्टीने आपण अतिशय कमकुवत आहोत असे संबोधले जाते. यामुळे विचारी मनाला एक समज देऊन चांगल्या प्रकारचे नियोजन आखून, नियोजनबद्ध पद्धतीने गेल्यास संसार सुखाचा होऊ शकतो.



माणसाचे जीवन लग्नानंतर खूप बदलते. अशावेळी जीवनात स्पार्क राखण्यासाठी उभयतांनी प्रयत्न करायला हवेत. या कामासाठी गरज असते ती मॅनेजमेंट स्किलची. जर आपण लग्नाबाबत गांभीर्याने विचार करीत असाल तर आपल्याला फ्युचर प्लॅनिंगही करावे लागेल.

जर आपण लग्नापूर्वीच वैयक्तिक व कौटुंबिक स्तरावर आर्थिक नियोजन केले, तर भविष्यात आपल्याला त्याचा खूपच आधार मिळेल. जर आपण सर्व माहित असूनही भावी स्थितीबाबत अज्ञानी राहाल तर सुखी संसाराचे त्रासात रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही. लग्नापूर्वी उभयतांनी एकमेकांची लाईफस्टाईल व खर्चाविषयी संपूर्ण माहिती घ्यायला हवी.

आपल्याला लग्नापूर्वीच आपले व आपल्या जोडीदाराचे एकत्रित उत्पन्न किती असेल आणि त्याचे खर्च किती असतील हे जाणून घ्यायला हवे. आपण उधळे आहात की काटकसरी हे आपल्या पार्टनरला सांगायला हवे. त्यानंतर आपले पक्के उत्पन्न किती आहे हे ही जाणून घ्या. कित्येकजण आपल्या पत्नीला कित्येक वर्षे आपले मासिक उत्पन्न किती आहे हे ही सांगत नाहीत. त्यामुळे पत्नीही पतीपासून बऱ्याचशा गोष्टी लपवून ठेवते व पतीला न विचारताच वायफळ खर्च करतात. आपल्या फॅमिली खर्चासाठी एकाच क्रेडिट वा डेबिट कार्डचा वापर करावा. त्यामुळे होणाऱ्या खर्चाचा अंदाज येईल व कोणत्याही खर्चांना आळा घालता येईल हे कळू शकेल. नवपरिणीत वधूने आपल्या पतीला त्याच्या कुटुंबीयांसोबत वेळ घालविण्याची संधी द्यायला हवी. प्रत्येक घराची संस्कृती वेगळी असल्याने कधीही माहेर-सासरची तुलना करु नये. नव्या घरी पतीशिवाय आणखी एखाद्या व्यक्तीचा विश्वास संपादन करावा. एकत्र कुटुंबात नव्या सुनेने आपल्या सासूचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करावा. सोबत शॉपिंगला जाणे, एकत्र चित्रपट पाहाणे यातून तिच्याशी जवळीक साधावी. यामुळे अडीअडचणीत तिची मदत आपण घेऊ शकाल. अशाप्रकारे आपला संसार मॅनेज कराल, तर

# समाजमाध्यमांमुळे नैराश्याचा धोका मुलींमध्ये दुप्पट

दिवसातला बराच वेळ समाजमाध्यमांवर (सोशल मीडिया) घालवणाऱ्या सध्याच्या युवा पिढीतील मुलींमध्ये यामुळे नैराश्याची लक्षणे निर्माण होण्याची शक्यता याच वयाच्या मुलांच्या तुलनेत दुप्पट असते, असे एका अभ्यासात दिसून आले आहे.

समाजमाध्यमे आणि नैराश्याची लक्षणे यांच्यातील परस्परसंबंधांचा वेध घेणारा हा पहिलाच अभ्यास असल्याचा दावा केला जात आहे. त्याचे निष्कर्ष 'ई-क्लिनिक मेडिसीन' या पत्रिकेत प्रसिद्ध झाले आहेत.

हा अभ्यास करताना इंग्लंडमधील 'युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन'च्या संशोधकांनी सुमारे ११ हजार युवकांविषयीच्या माहितीचे विश्लेषण केले. समाजमाध्यमांचा वापर



करण्याचे सर्वाधिक प्रमाण हे १४ वर्षीय मुलींमध्ये असल्याचे यात दिसून आले. यातील दोनपंचमांश मुली या दिवसात तीन तासांहून अधिक काळ समाजमाध्यमांवर घालवतात. त्या तुलनेत समाजमाध्यमांत रममाण होणाऱ्या मुलांचे प्रमाण एकपंचमांश असल्याचे निष्पन्न झाले.

समाजमाध्यमांचा वापरच न करणाऱ्या मुलींचे प्रमाण केवळ चार टक्के, तर मुलांचे १० टक्के असल्याचे या अभ्यासातून समजले. समाजमाध्यमांचा माफक वापर करणाऱ्या १२ टक्के युवकांमध्ये तसेच या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करणाऱ्या (दिवसाला पाच किंवा अधिक तास) ३८ टक्के व्यक्तींमध्ये अधिक तीव्र नैराश्याची लक्षणे आढळल्याचे या अभ्यासात नमूद केले आहे.

याबाबत 'युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन'चे प्राध्यापक युव्होन केली म्हणाले की, समाजमाध्यमांचा वापर आणि नैराश्याची लक्षणे यांच्यातील संबंध मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये जास्त दिसून येतो. मुलींच्या बाबतीत त्या दिवसातून समाजमाध्यमांवर जितका जास्त वेळ घालवतात, त्या प्रमाणात त्यांच्यातील नैराश्याची लक्षणे वाढत जातात. मुलांच्या बाबतीत, जे दिवसाचा तीन तास किंवा अधिक वेळ समाजमाध्यमांवर असतात, त्यांच्यात नैराश्याची अधिक लक्षणे दिसतात. समाजमाध्यमे आणि नैराश्यातील संबंधाचा कार्यकारणभाव समजून घेण्याचा प्रयत्न संशोधकांनी केला तेव्हा इंटरनेटवरून छळणूक (ऑनलाइन हॅरॅसमेंट, सायबर बुलिंग) झाल्याचे प्रकार ४० टक्के मुली आणि २५ टक्के मुलांनी अनुभवल्याचे स्पष्ट झाले.

# अर्धशिशी म्हणजे काय? जाणून घ्या डोकेदुखीची विविध कारणे

डोकेदुखी अनेकवेळा अशा कारणांमुळे होते, ज्याबाबत पीडिताला काहीच माहीत नसते. तसेच काही लोक असेही असतात, जे अर्धशिशीने पीडित असतानाही अनभिज्ञ असतात आणि त्यास सामान्य डोकेदुखी समजून स्वत:च वेदनाशामक गोळ्यांचे सेवन करतात. डोकेदुखीने विक्राळ रूप धारण करू नये, यासाठी डोकेदुखीबाबत सविस्तर माहिती असायला हवी, असे तज्ज्ञांचे मत आहे. माहितीअभावी इतरही काही आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागतो. जाणून घेऊया वेदनेशी निगडित विविध पैलूंबाबत.

हे माहीत आहे काय?

चार टक्के लोक दररोज डोकेदुखीने त्रस्त असतात.

अर्धशिशी झाल्यानंतर हे करा

- डॉक्टरांनी दिलेल्या औषधींचे सेवन
- अंधाऱ्या खोलीत आराम करणे
- डोके व मानेत वेदना झाल्यास थंड वा गरम दबाव टाकणे.
- कॅफिनचे मर्यादित सेवन

डोकेदुखीवर ८ सुलभ उपचार

१. आराम करणे
२. आइस पॅक लावणे
३. नियमित व्यायाम करणे
४. डायटरी सप्लिमेंट्स
५. पेय पदार्थ व पाण्याचे भरपूर सेवन
६. थोडीशी मालिश, ॲक्युपंक्चर
७. कोमट पाण्याने स्नान करणे
८. दिवसभर चार-पाच वेळा अल्पोपाहार घ्या

तणावाची कारणे

अनेक लोकांना अधिक तणाव, अस्वस्थ असताना वा चुकीच्या बॉडी पॉश्चरमुळे मानेच्या स्नायूंवर पडणाऱ्या अनावश्यक दबावाने डोकेदुखी होते.

तुम्हाला हे माहीत आहे का?

तणावामुळेच डोकेदुखी अधिक होते. तसेच ७५ टक्के अर्धशिशीने पीडित व्यक्ती मानेच्या वेदनेनेही त्रस्त असतात, हे तुम्हाला माहीत आहे का? तज्ज्ञांच्या मते, मानेत होणाजया वेदनेचा अर्थ असा नव्हे की, तुम्हाला नेहमी होणारी डोकेदुखी याच प्रकारची असेल.



अर्धशिशी (मायग्रेन)

केवळ ५० टक्के लोकांच्याच अर्धशिशीची समस्या लक्षात येते.

अनेक लोकांना वाटते की, जोपर्यंत संपूर्ण डोके अर्धशिशीच्या विळख्यात येत नाही, तोपर्यंत अर्धशिशी होऊच शकत नाही. १५-२० टक्के लोकच अशा प्रकारच्या अर्धशिशीने पीडित असतात.

अनेक लोकांची स्थिती इतकी वाईट असते की, त्यांना कार्यालयातील कामातून सुटी घ्यावी लागते, तर काहीजण अर्धशिशीने पीडित असतानाही महिनाभरात केवळ काही तासच काम करू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, अर्धशिशी ही १९ व्या क्रमांकावरील अशी आरोग्य समस्या आहे, ज्यामुळे पीडित व्यक्तीच्या जीवनावर अनेक वर्षे परिणाम होऊ शकतो.

**अस्थिविवर**

ज्या लोकांना अस्थिविवर संसर्गासोबतच डोकेदुखीही असते, त्यांना ताप, पडसे व अस्थिविवरात तीव्र वेदना होण्याची शक्यता असते.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

सायनस डोकेदुखी केवळ एखाद्या आरोग्य समस्येचा संकेत नाही, तर ते याचेही प्रमाण आहे की, तीव्र डोकेदुखीच वास्तविक सायनसला कारणीभूत आहे. जवळपास ९० टक्के लोकांना जेव्हा सायनस डोकेदुखीने पीडित असल्याचा संशय येतो, तेव्हा ते प्रत्यक्षात अर्धशिशीनेही पीडित असतात.


**क्लस्टर तुम्हाला हे माहीत आहे का?**

अशावेळी पीडिताच्या डोळ्यांच्या आसपास व डोक्याच्या वरच्या भागात तीव्र वेदना होतात, ज्याचा कालावधी जवळपास २० मिनिटे ते दोन तास असू शकतो. डोळ्यांतून पाणी येणे, नाक जाम झाल्याने श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे दिसतात. तथापि, ही लक्षणे इतर प्रकारच्या डोकेदुखीतही आढळतात.

क्लस्टर डोकेदुखी अर्धशिशीपेक्षा वेगळी असल्याने उपचारही वेगळेच केले जातात.

# थायरॉईडच्या समस्या सोडविणे सहज शक्य

गळ्यात थायरॉइडच्या ग्रंथी असतात. हार्मोन सक्रिय करून मेटाबॉलिझम कार्यप्रवण ठेवणे हे त्यांचे मुख्य काम आहे. हा हार्मोन गरजेपेक्षा कमी वा अधिक सक्रिय झाल्यानंतर थायरॉइडशी निगडित समस्या उद्भवतात. यामुळेच वजन वाढणे व अनिद्रेसारख्या समस्यांना चालना मिळते. तज्ज्ञांच्या मते, भोजनप्रणालीत बदल करून या समस्येतून सुटका होऊ शकते. ती घरगुती पातळीवरही नियंत्रित केली जाऊ शकते.



जे लोक हायपोथायरॉइडिझमने पीडित असतात त्यांनी धूम्रपान व मद्यपान अशा व्यसनांपासून दूर राहायला हवे.

पीडित व्यक्तीने नेहमी संतुलित आहार घ्यावा आणि आहारात जीवनसत्त्व अ, ब व ई भरपूर असावे.

ब्रोक्कली (एक प्रकारची कोबी), पालक, मुगाच्या शेंगा व सोयाबीनचे सेवन केल्यास थायरॉइड ग्रंथीवर प्रतिकूल परिणाम होतो.

तज्ज्ञांच्या मते, जे लोक थायरॉइडशी निगडित व्याधींनी पीडित आहेत त्यांनी विशेषत: उपरोक्त खाद्यपदार्थांपासून दूर राहायला हवे.

थायरॉइड ग्रंथींची कार्यप्रणाली सुरळीत ठेवण्यासाठी जीवनसत्त्व ड अत्यावश्यक आहे. अंडी व दूध त्याचा चांगला स्रोत आहे. त्यासोबत उन्हाच्या संपर्कात येणेही अत्यावश्यक आहे. कारण त्यामुळे जीवनसत्त्व ड नैसर्गिकरीत्या मिळते.

हायपरथायरॉइडिझम अर्थात ज्यांच्या शरीरात थाइरॉइड हार्मोन अधिक बनते त्यांची हाडे व स्नायू दुर्बल होऊ लागतात. अशा वेळी त्यांना आहारात कॅल्शियमचे प्रमाण वाढवायला हवे.

तज्ज्ञांच्या मते, पीडित व्यक्तीने दररोज १ हजार मिलिग्रॅम कॅल्शियमचा आहारात समावेश करायला हवा. चीज, दही, ताक व पनीर अशा सर्व दुग्धजन्य पदार्थांत कॅल्शियम असते.

अन्न शिजवण्यासाठी नेहमी आयोडिनयुक्त मिठाचाच वापर करा. कारण त्याच्या कमतरतेमुळेच या समस्या उद्‌भवतात.

# मुलींप्रमाणे मुलेही कर्णछेदन करीत असतात कारण ...?

हिंदूधर्मानुसार व्यक्तिच्या जीवनातील मुख्य सोळा संस्कारांमध्ये कर्ण छेदनाचाही समाववेश आहे. प्राचीन काळी मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करून त्यात मुलांचे कर्णछेदन केले जायचे. यासंस्काराचे प्रत्येक जण पालन करीत असे. परंतु आजच्या आधुनिक काळात मुले फॅशन म्हणून कर्णछेदन करतात. तर कान टोचणेही केवळ मुलींशी निगडीत परंपरा उरली आहे.



पूर्वीच्या काळी मुलांचेही कान टोचले जात होते. विशेष म्हणजे मुलांच्या कानात कर्ण कुंडले घातली जात असत. मात्र आज मुले एका कानात बाळी घालतात आणि तेही फॅशन म्हणून.

मुलांचे कर्ण छेदण्यामागे एक शास्त्र असल्याचे पूर्वीची लोक सांगत. कर्ण छेदल्याने डोक्याच्या दोन्ही भागात एक्यूप्रेशर आणि एक्यूपंचरचे कार्य सुरळीत चालते. विशेष म्हणजे मेंदूची कार्यक्षमता वाढते. सोबत कानात बाळी घातल्याने रोगप्रतिकारक शक्ति वाढते. या व्यतिरिक्त कर्णछेदनाला धार्मिक महत्त्वही आहे.

# बिघडलेला मूड करा गुड

आपला मूड बिघडला आहे आणि आपण त्यात बुडत चालला आहात. काहीही चांगले वाटत नाही. नकारात्मकता आपल्या अंगात भिणत चालली आहे. आपल्या आपला हा बिघलेला मूड पुन्हा गुड करायचा असेल तर -



जोरात किंचाळा - जर आपला मूड खूपच खराब असेल तर एखाद्या निर्मनुष्य जागी जाऊन जोरात किंचाळा. हे शक्य नसेल तर मनातलं सारे वाईट विचार, कटू गोष्टी कागदावर उतरून काढा.

एखाद्याला फूल पाठवा - आपल्या एखाद्या शुभचिंतकाला फूल पाठवा वा त्याला भेटून त्याने आपल्याला दिलेल्या गोष्टींबाबत त्याचे आभार माना. यामुळे आपले मन इतरत्र गुंतून मूड शांत होण्यास मदत होईल.

आरशाचा आधार घ्या - जेव्हा राग येईल तेव्हा आरशासमोर उभे राहून मुठी आवळा, तोंड वेडेवाकडे करीत भले बुरे बोला वा आपण खूप दमलो आहोत असे उभे राहा. खांदे झुकवून, चेहरा पाडून आणि स्वत:ला पाहा.

श्वास या व सोडा - खोल श्वास घेऊन म्हणा 'हॅपीनेस इन' व श्वास सोडत म्हणा 'बॅड मूड आउट' मूड मूड करण्याचा हा अत्यंत उत्तम उपाय आहे.

सुखद आठवणी आठवा - आपला सुखद, यशदायक, आनंदी काळ आठवा. डोळे मिटून त्या काळात पुन्हा जगण्याचा प्रयत्न करा.

विनाकारण हसा - आपल्या रूममध्ये जाऊन असे समजा की, आपल्या पोटात एक फुगा आहे. जो पोटातून, छातीतून आपल्या तोंडाकडे येत आहे. आता जोरजोरात हसा. दोन्ही हात वर करून खळखळून हसण्याचा प्रयत्न करा.

मनपसंत सुगंध वा खाणे - आपल्या मनपसंत सुगंधाच्या वा खाण्याच्या शोधात बाहेर पडा व ते मिळाल्यानंतर खजिना मिळाला आहे असे समजा.

बागेत जा - बागेत जाऊन एखादी मजेशीर गोष्ट करावी. उदा एखादे फेसाळ ड्रिंक घेऊन बागेतील बेचवर बसा. बाटली जोरात हलवा. जणू त्यावर सारा राग काढत आहात.

# काही मुलींना साखरपुड्याचं टेन्शन येतं

साखरपुडा झाल्यावर तरुण मुलींच्या मनावर दडपण येत राहते. पूर्वी ती मनसोक्त वागत असते. मित्र-मैत्रिणींना फोन करून अभ्यासाबाबत बोलत असते. ग्रुपबरोबर सिनेमा, खरेदी वगैरे होत असते; पण साखरपुडा झाल्यावर अशा सैल वागण्यावर नकळत बंधन येतं. कोणी आपल्याला पाहील का ? आपल्यावर कोणाची पाळत तर नाही ना ? असे वाटत राहते.



साखरपुडा ते लग्न या काळात मुली फार तणावात असतात. एकतर त्या शिक्षण घेत असतात किंवा नोकरी करत असतात. अशावेळी घरातील ज्येष्ठ माणसं निरनिराळ्या सूचना देत राहतात. बाहेर जास्तवेळ राहू नकोस रस्त्यात कुणाशी बोलू नकोस. साधे कपडे घाल. फॅशन करू नकोस. असे त्यांचे सल्ले योग्य असले, तरी ते भंडावून सोडणारे वाटतात. खरं म्हणजे मुलीला साखरपुडा झाल्यावर तिच्याकडे पाहणाऱ्यांची संख्या वाढलेली असते. पाहुणे मंडळी वरचेवर तिची दखल घेत असतात. सणसमारंभात तिला आवर्जून घरी घेऊन जातात. त्याचवेळी होणारा नवरा तिला छेडत असतो व एकांत मिळताच हळूच चोरटे चुंबन घेऊ पाहतो.

काही मुलींना हे बरं वाटतं, तर काही मुलींना याचं जाम टेन्शन येतं. साखरपुडा झाल्यावर भडक फॅशनचे कपडे, टाईट पँट, शर्ट मुलींनी घालू नयेत. आपले सौंदर्य खुलवण्यासाठी सौंदर्योपचार मात्र घेत राहावेत. मन शांत ठेवावे. आपला अभ्यास शांतचित्ताने करावा. काही अधीर तरुण आपल्या होणाऱ्या पत्नीला वरचेवर फोन करून खुशाली व तिची आवड-निवड विचारत राहतात. तसेच फिरायला येण्याबद्दल विचारतात. अशावेळी त्या तरुणीने स्पष्ट नकार द्यावा किंवा बरोबर धाकट्या भावाला किंवा बहिणीला घेऊन त्याच्या बरोबर फिरायला जावे. विवाहापर्यंत आपले सौंदर्य कसे अधिक खुलेल याच प्रयत्नात तरुणीने राहावे. त्वचा उजळ करणारी उटणं, चंदन पावडर लावून शरीर नितळ बनवावे व मन प्रसन्न ठेवावे. साखरपुड्यानंतर विवाह फार काळ लांबवू नये असे जाणकार म्हणतात.

# स्तनपान करण्याची नेमकी पद्धत काय आहे? डॉक्टर काय सांगतात?

आईच्या दुधाच्या निर्मितीसाठी विशिष्ट प्रकारची संरचना असते. साधारणत: बाळाला वयाच्या सहा महिन्यांपर्यंत केवळ हाच आहार देण्यात येतो. पण बाळाला योग्य पद्धतीने स्तनपान देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण चुकीच्या पद्धतीने केलेल्या स्तनपानाने मातेला पाठदुखी, स्तनांना सूज येऊन त्यात रक्त किंवा पाणी साठणे, ताप येणे इत्यादी समस्या उद्‌भवू शकतात. आज आपण पाहू या डॉ. अमृता पुनसे तुपकर यांनी सांगितलेली स्तनपानाची योग्य पद्धत.

**आईला आरामदायक स्थिती**

बाळाच्या आईला जी स्थिती आरामदायी वाटत असेल त्या स्थितीत तिने स्तनपान द्यावे. (right position for breastfeeding) त्यावेळी तिच्या पाठीला आधार असणे महत्त्वाचे आहे. स्तनपान देण्यासाठी भारतीय पद्धत, क्रेडल पद्धत, मॉडिफाईड क्रेडल पद्धत, साईड लाइंग पद्धत (आडवे पडून बाळाला स्तनपान देऊ नये, हा एक गैरसमज आहे) या सर्व पद्धतींमध्ये उत्तम आरामदायी स्तनपानासाठी काही नियम पाळले गेले पाहिजेत.

डॉ. अमृता पुनसे तुपकर यांनी सांगितलेली माहिती येथे पहा

**काय आहेत नियम**

**अ.** बाळाचे तोंड पूर्ण उघडले असावे.

**ब.** बाळाच्या हनुवटीचा स्पर्श स्तनाला व्हावा.

**क.** स्तनमंडल आधी बाळाच्या तोंडाच्या वर आणि नंतर खालून दिसावे.

**ड.** बाळाचा खालचा ओठ बाहेरच्या बाजूला वळलेला असावा.

सर्व स्थितींमध्ये बाळाचे पूर्ण शरीर आईच्या समोर असावे. बाळाचे डोके, मान यांना शरीराच्या एका रेषेत आधार मिळावा आणि ते स्तनांच्या समोर असावे. स्तनाचा योग्य प्रकारे स्पर्श होत असेल तर दूध पुरेसे येते, ते बाहेरही सुरळीत निघते आणि बाळापर्यंत त्याचा प्रवाहही योग्य राहतो.

**जन्मल्यापासून लवकरात लवकर स्तनपान**

स्तनपानासाठी बाळ जन्मापासून आईजवळ दिवस-रात्र असणे अपेक्षित



आहे. सामान्य प्रकृती असलेल्या बाळाला जन्मानंतर तीस मिनिटांच्या आत आईच्या पोटावर किंवा छातीवर ठेवावे. त्यामुळे बाळाला उब मिळते आणि स्तनपान करण्याची संधी मिळते. स्तनपान जेवढ्या लवकर सुरू होईल, तेवढ्या लवकर आई आणि बाळामध्ये भावनिक बंध निर्माण होतो.

**बाळाची भूक**

आईला बाळाच्या भुकेचे संकेत (मुठी चोखायला लागणे, डोके स्तनांकडे वळविणे, स्तन शोधणे) समजून आणि बाळ रडेपर्यंत थांबण्याऐवजी त्याचे संकेत समजून स्तनपान द्यावे. वेगवान स्तनपान करणारी बाळे साधारणत: ५-६ मिनिटांत पूर्ण स्तन रिकामा करतात आणि मंद स्तनपान करणारी बाळे स्तनपानास १५-२० मिनिटे लावतात. बाळ पाणीदार, अधिक प्रमाणातील लॅक्टोज, प्रथिने, जीवनसत्वे, क्षार आणि पाणी ग्रहण करते आणि त्याची तहान भागवते.

**योग्य क्रम**

अग्रभागातील दूधातून आवश्यक ते घटक बाळाला मिळतात. मागील भागातील दुधात स्निग्धांश मोठ्या प्रमाणात असतात आणि त्यामुळे बाळाची भूक भागते. बाळाच्या सुदृढ वाढीसाठी हे आवश्यक असते. त्यामुळे बाळाची इच्छा असेपर्यंत त्याला स्तनपान द्यावे. स्तनपानामुळे बाळाची तहान आणि भूक दोन्ही भागते. जेव्हा बाळ पहिले स्तन स्वत:हून सोडते तेव्हा आईने त्याला दुसर्या स्तनापाशी घ्यावे. बाळाची तहान-भूक भागली असेल तर ते दुसर्या स्तनाचे स्तनपान करणार नाही. दुसर्या स्तनपानाच्या वेळी पहिल्यांदा दुसऱ्या स्तनाने पाजावे, जेणेकरून दोन्ही स्तनांमधून पुरेसे दूध मिळेल.

**टीप :** हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■■■

## मंद सुगंधाने व्हा धुंद

■ एखाद्या पार्टीला चालला असाल, तर मंद सुगंधाचा वापर करा.

■ सकाळी व सायंकाळी सुगंधाचा वापर करणे उत्तम असते.

■ सुंगध वापरण्यापूर्वी आपले शरीर व्यवस्थित स्वच्छ करा.

■ कूलरच्या पाण्यात वा वाळ्यात सुंगध ठेवून थंड वाऱ्यासोबत मंद सुगंधाचा आनंद लुटा.

■ मान, कानाजवळ, काखेत सुंगधाचा वापर करणे डॉक्टरांनी योग्य समजले आहे.

■ प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी यांना पाठवण्याच्या प्रेम पत्रांमध्येमंद सुगंधाचा वापर करता येतो.

■ झोपताना उशीवर व बिछान्यावर मंद सुगंध शिडकल्यास सुखद झोप येईल.

■ कपड्यांवर सुगंध वापरताना अंतर्वस्त्रांना सुगंधाचा वापर करावा. यामुळे तो जास्त काळ टिकेल.

■ पार्टी व इतर प्रसंगी टेबलावर सजवून ठेवलेल्या कृत्रिम फ्लॉवरपॉटवर सुगंध स्प्रे करुन वातावरण सुंगधित होईल.

# पावसात लसूणला बुरशी येणार नाही, लसूण साठवण्याची सर्वोत्तम पद्धत

## महिनोनमहिने राहील ताजा

भारतातील अनेक भागात पावसाचे आगमन झाले आहे. अशा परिस्थितीत हवेतील आर्द्रता वाढली आहे. वाढत्या आर्द्रतेमुळे स्वयंपाकघरात ठेवलेला लसूण सहजपणे बुरशीचा बळी पडू शकतो. खरं तर, प्रत्येक स्वयंपाकघरात लसूण मसाला म्हणून वापरला जातो. तो केवळ अन्नाची चव वाढवतोच, परंतु आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. परंतु अनेकदा लोक तक्रार करतात की पावसाळ्यात लसूण लवकर खराब होतो किंवा बुरशी येते. परंतु जर लसूण योग्यरित्या साठवला तर तो महिनोनमहिने ताजा राहू शकतो. येथे सांगितलेल्या केलेल्या सोप्या आणि प्रभावी पद्धतींचा अवलंब करा आणि लसूण बराच काळ खराब होण्यापासून वाचवू शकता.

**लसूण कोरड्या आणि थंड जागी ठेवा** : लसूण साठवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तो कोरड्या आणि थंड जागी ठेवणे. लसूण ओलाव्यापासून दूर ठेवणे खूप महत्वाचे आहे, कारण ओलाव्यामुळे त्यात बुरशी येऊ शकते. तुम्ही ते सावलीच्या ठिकाणी किंवा सामान्य खोलीच्या तापमानात ठेवू शकता.



**जाळीदार पिशव्या किंवा कागदी पिशव्या वापरा** : लसूण साठवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी जाळीदार पिशव्या किंवा कागदी पिशव्या वापरा.

या पिशव्या हवेचा प्रवाह राखतात, ज्यामुळे लसूण बराच काळ ताजा राहतो. अशा जाळीदार पिशव्या बाजारात सहज उपलब्ध आहेत, ज्यामध्ये तुम्ही काळजी न करता लसूण साठवू शकता.

**काचेच्या भांड्यात साठवा** : जर तुम्हाला लसूण जास्त काळ साठवायचा असेल तर तो काचेच्या भांड्यात ठेवा. काचेच्या भांड्यात लसूण ठेवा आणि त्याचे झाकण थोडे उघडे ठेवा जेणेकरून त्यात ओलावा जमा होणार नाही. लक्षात ठेवा की भांडे थंड आणि कोरड्या जागी ठेवावे.

**लसूण सोलून गोठवा** : दुसरा सोपा मार्ग म्हणजे लसूण सोलून फ्रीजरमध्ये ठेवणे. यासाठी, लसूण पाकळ्या सोलून हवाबंद डब्यात ठेवा आणि गोठवा. यामुळे लसूण ताजे तर राहीलच, शिवाय वापरण्यासही सोपे होईल.

**लसूण पेस्ट बनवा आणि साठवा** : लसूण बराच काळ साठवण्याची ही पद्धत खूप लोकप्रिय आहे. यासाठी, लसूण सोलून त्याची पेस्ट बनवा आणि फ्रीजमध्ये हवाबंद डब्यात ठेवा. त्यात थोडे मीठ किंवा तेल घालून तुम्ही पेस्टची ताजेपणा वाढवू शकता.

**लसूण तेलात बुडवा** : जर तुम्हाला लसूण महिने टिकवायचा असेल तर तो तेलात बुडवा. यासाठी लसूण पाकळ्या सोलून काचेच्या भांड्यात ठेवा आणि त्यावर ऑलिव्ह ऑइल ओता. अशा प्रकारे लसूण बुरशी येणार नाही आणि बराच काळ ताजा राहील.

**लसूण उन्हात वाळवा** : लसूण साठवण्याची पारंपारिक पद्धत म्हणजे तो उन्हात वाळवणे. लसणाच्या पाकळ्या उन्हात पूर्णपणे वाळवाव्यात आणि नंतर त्या कागदी पिशवीत किंवा काचेच्या भांड्यात ठेवाव्यात.लसूण योग्यरित्या साठवणे खूप सोपे आहे. जर तुम्ही वर उल्लेख केलेल्या कोणत्याही पद्धतींचा अवलंब केला तर तुमचा लसूण अनेक महिने ताजा आणि बुरशीमुक्त राहील. या सोप्या पद्धतींमुळे तुमचा वेळ तर वाचेलच, पण लसणाची गुणवत्ताही चांगली राहील.

# चहाबरोबर चुकूनही पकोडे खाऊ नका; वाचा तज्ज्ञांनी सांगितलेले कारण

सकाळ असो किंवा संध्याकाळ, अनेकांना गरमागरम कुरकुरीत पकोड्यांबरोबर चहा पिणे आवडते. खरं तर तळलेले पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक असतात आणि जर हे पदार्थ तुम्ही चहाबरोबर खात असाल तर त्याचा परिणाम पचनक्रिया आणि पोषक तत्वांच्या शोषण क्षमतेवर दिसून येतो, त्यामुळे पकोड्यांबरोबर चहा प्यावा का हा प्रश्न निर्माण होतो. आज आपण त्याविषयी सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत.

**चहासह पकोडा खावा का?**

मुंबईच्या सर एचएन रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल येथील क्लिनिकल आहारतज्ज्ञ वेदिका प्रेमानी यांनी याविषयी माहिती दिली. त्या सांगतात की, चहासह पकोडा खाणे हे आरोग्यासाठी चांगले नाही, पण त्यात आले, दालचिनी आणि वेलचीसारख्या पोषक पदार्थांचा समावेश असतो, ज्यामुळे चहाची चव तर वाढतेच पण त्याबरोबर रोगप्रतिकारक शक्तीसुद्धा वाढते आणि चहा अँटी इन्फ्लामेटरी (शरीराच्या वेदना किंवा सूज कमी करण्यासाठी वापरले जाणारे घटक) म्हणून काम करते. बेकिंग आणि एअर फ्रायिंगसारख्या इतर स्वयंपाक पद्धतीचा वापर करून शरीरास निरोगी असलेल्या तेलांमध्ये पकोडे तळले तर याचा आनंद घेता येतो.

चहा आणि पकोडा आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे वैज्ञानिक कारण काय आहे?

चहामध्ये टॅनिन आणि ऑक्सलेट असतात. जेव्हा पोषक घटकांचा समावेश असलेल्या अन्न पदार्थांबरोबर चहाचे सेवन केले जाते, तेव्हा त्या पदार्थातील लोह आणि कॅल्शियमसारख्या पोषक तत्वांचे शोषण कमी होते. याशिवाय वारंवार गरम केलेल्या तेलात तळलेले पकोडे खाल्ल्याने ट्रान्स फॅटी ॲसिडसुद्धा शरीरात तयार होते, असे वेदिका प्रेमानी सांगतात.



**चहासोबत कोणते पदार्थ खाणे टाळावेत?**

अनेक जण चहाबरोबर बिस्किटे आणि कुकीज खातात, ज्यामध्ये फॅट्स आणि साखर असते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.

चहाबरोबर आणखी आवडीने खाल्ला जाणारा लोकप्रिय नाश्ता म्हणजे समोसा, ज्यामध्ये फॅट्सचे प्रमाण सर्वाधिक असते.

ब्रेडसारखे इतर बेकरीचे पदार्थसुद्धा चहाबरोबर खाणे योग्य नाही, कारण त्यात सोडियम, साखर आणि सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडचे प्रमाण अधिक असते.

चहाबरोबर खाता येईल असे आरोग्यदायी पदार्थ कोणते आहेत? हेल्दी नाश्त्याच्या पर्यायांमध्ये बेक्ड रागी चिप्स, ढोकळा, मखाना, चना चाट आणि हंग दह्यासह खाकरा, एअर फ्राइड भाज्यासुद्धा पकोड्यांना चांगले आरोग्यदायी पर्याय असू शकतात, असे वेदिका प्रेमानी सांगतात.

त्यांनी हेल्दी चहाचे काही पर्यायसुद्धा सुचवले आहेत, जे तुम्हाला फायदेशीर ठरू शकतात.

**कॅमोमाइल चहा :** हा चहा त्याच्या आरामदायी गुणधर्मासाठी ओळखला जातो. यामुळे शांत झोप लागते. तणाव कमी होतो.

**रोझमेरी चहा :** यात असलेले अँटीऑक्सिडंट प्रभावी असतात, जे व्यक्तीची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करतात.

**हळद आणि आल्याचा चहा :** हळदीमध्ये अँटी इन्फ्लामेटरी गुणधर्म असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यास मदत करतात.

चहामध्ये काळी मिरी आणि वेलची पावडर टाका. काळी मिरीमध्ये पिपेरिन (झळशिळपश) नावाचा घटक असतो, जो पोषक तत्वांचे शोषण करण्यास मदत करतो, तसेच वेलची चहाचा ताजेपणा वाढवण्यास आणि पचनक्रिया सुधारण्यास मदत करते.

# स्त्रिया आहेत म्हणून जग सुंदर आहे

स्त्रियांच्या बाबतीत बरेच पुरूष वैतागून म्हणतात, 'त्या बायकांना डोके कमी असतं म्हणून व्यापाऱ्यांचं फावतं. काही असो, स्त्री आहे म्हणून पुरूष कष्ट करतो, स्त्री आहे म्हणून पैसा खर्च होतो, स्त्री आहे म्हणून पैसा खर्च होतो, स्त्री आहे म्हणून घरं उभी राहिली.

सगळेच पुरूष असते तर घरं, बंगले दिसलेच नसते. सगळे पुरूष उघड्या मैदानात चटया अंथरून उघडे झोपले असते. या जगात फुलांना किंमत स्त्रियांमुळे. मुलांच्या आया होण्यात स्त्रीला आनंद. तिच्यामुळे माया आहे. ती रागावते, प्रेम करते म्हणूनच तिच्या



खर्चाबद्दल कोणी तक्रार करत नाही. स्त्री असूया बाळगते म्हणूनच घरात वस्तू येतात. नुसतेच सगळे पुरूष असते, तर रस्ताभर सिगारेटची थोटकं पडलेली दिसली असती. कथांमध्ये स्त्रिया असतात, त्यामुळे त्या वाचनीय होतात. स्त्रिया आहेत म्हणून तुम्ही आम्ही आहोत. या स्त्रियांचे अस्तित्त्व आणखी कशाकशात आहे ते पहा-स्त्री प्रेमात आइस्क्रीम बनते. पुरूष कोन असतो. राग आला की, स्त्री वणवा बनते. पुरूषाचं पाणी पाणी करते, स्त्री मधासारखी गोड असते. स्त्रीमुळे नशा आहे.

तिनं हसून पाहिलं की हृदयाची काच तडकते, स्त्रीशी मैत्री म्हणजे बागेतला विहार, सर्वत्र सुवास आणि पायाखाली हिरवळ, स्त्री गप्प असली की, पुरूषाला उदास वाटतं किंवा ती वादळापूर्वीची शांतता असू शकते. स्त्री छान समजूत घालते, स्त्री ही पुरूषांना देवानं दिलेली अलौकिक भेट आहे. ती सुखी तर देश सुखी.

ज्याची वाट पाहणारी स्त्री घरी आहे, तो भाग्यवान ! आई, बहीण व मुलीच्या रूपात स्त्री देवतेला जो पुरुष पुजतो, मानतो त्याला अन्न कमी पडत नाही व गृहदेवतेच्या मनाप्रमाणे जो वागतो त्याला सुख कमी पडत नाही, असे म्हणतात.

## छान छान गोष्टी...

## मी साहेब नाही


बंगाली साहित्यातील एक युगपुरुष मायकेल मधुसूदन दत्त हे एकदा पूर्व बंगालच्या पाटनगरीत एका शहरात गेले होते तेव्हा तेथील साहित्यप्रेमी युवकांनी त्यांना मानपत्र दिले. आता मानपत्रांची भाषा म्हणजे फुलोरा आलाच. त्या युवकांनी लिहिले होते, आपली विद्या, आपली बुद्धी, आपली प्रतिभा यांच्या तेजाने आम्ही साहित्यरसिक प्रफुल्लवदन झालो आहोत. फक्त एका गोष्टीचा विषाद वाटत होता. आम्ही ऐकले होते की, आपण इंग्रज झाला आहात. (कारण त्यांनी एका इंग्रज मॅडमेशी संसारही थाटला होता) पण आपल्या आचरणाने आणि आपल्या संभाषणाने आमची भीती अनाठायी असल्याचे सिद्ध झाले, हे नमूद करण्यास आनंद वाटतो.

# सुगरणीचा सल्ला

❒ आपण चाकवताची भाजी करताना पुढील शेंडे व कोवळी देठे घेतो वा उरलेली टाकून देतो. ती न टाकता छोटे तुकडे करून वाळवून ठेवावीत व तुरीचे वरण शिजवताना डाळीत छोटे तुकडे टाकावेत. न शिजणारी डाळही लवकर शिजते व देठातील सत्व पण मिळते.

❒ टोमॅटोचे सार करताना त्यात कांदा, लसूण बरोबर चमचाभर मुगाची डाळही शिजवावी. सार दाट होते. त्याला मैदा किंवा कॉर्नफ्लोअर लावावे लागत नाही, मुख्य म्हणजे या साराचे आहारमूल्य वाढते.

❒ कोणत्याही प्रकारच्या जाड शेवया घ्याव्यात. नंतर ज्या उपलब्ध भाज्या असतील त्या घेऊन कांदा-टोमॅटो घालून सरसरीत रस्सा भाजी करावी व त्यात शेवया चांगल्या शिजू द्याव्यात. वरून कोथिंबीर घालावी. अगदी मोकळं केल्यास (कमी पाणी घालून) शेवयांचा उपमा तयार होईल. नाही तर ब्रेडबरोबर खाण्यास रस्सा भाजी तयार होईल. या 'वन-मील-डीश' मुळे मुलं ज्या भाज्या



अजिबात खात नाहीत त्या त्यांच्या आहारात आपोआप येतात.

❒ टिक्की-बटाटेवडा-पॅटीस-कटलेट करताना बटाट्याचा मॅश वापरतो तेव्हा लगदा तयार करताना त्यात थोडं दूध, लोणी किंवा साय टाकावी. मॅशला छान वास येतो.

❒ बाजारातून आणलेले आले, सर्व काही वापरले जात नाही. ते वाळून जाते व कडक होते. अशा वेळी ते लहानग्या कुंडीत ओल्या मातीत खुपसून ठेवावे. आयत्या वेळी कुंडीतून काढून स्वच्छ धुऊन पदार्थात घालता येते.

❒ वांग्याचे काप करावयाचे असल्यास (भजी नव्हे), थोड्या पाण्यात चण्याच्या डाळीएवढा सोडा टाकून, त्यात वांग्याचे काप दहा मिनिटे ठेवावेत व नंतर पिठात घोळवून, तव्यावर तेल सोडून लावावेत. काप लवकर तयार होतात. तेलाची व इंधनाची बचत होते व काप चविष्ट लागतात.

❒ पीठ पेरून करावयाच्या भाजीबरोबर हरबरा डाळीचे पीठ प्रथम तेलावर चांगले भाजून घ्या. चार चमचे पिठासाठी दोन चमचे तेल, तूप पुरे. पीठ तुपामध्ये भिजलेले दिसले पाहिजे. भाजी धुऊन, चिरून व कुकरमध्ये शिजवून घ्या. फोडणीला कमी तेल लागेल. जिरे, मोहरी, बुडण्यापुरते अर्धा चमचा तेल पुरे. फोडणीमध्ये चिरलेला कांदा, लसूण घालून चांगले परता. नंतर शिजवलेली भाजी व भाजलेले पीठ, मीठ, मसाला, तिखट, हळद मिसळून परता. भाजी मोकळी होईल.

❒ ओल्याकांद्याची कोवळी पात कांद्याच्या गड्डीबरोबर येते. कांदे बाजूला काढून पात धुऊन स्वच्छ पुसून घ्यावी व बारीक चिरून तिला चवीप्रमाणे मीठ, तांबडे तिखट लावून वरून गोडेतेल थोडेसे टाकून त्यावर लिंबू पिळावे. ही पात तशीच हिरवी जेवणाबरोबर तोंडी लावण्यास फारच चवदार लागते.


**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता,**
**प्रशासन संगणकीकरण विभाग, कोथरूड,**
**जि. पुणे. यांचे कार्यालय**
ई-मेल-eeacd.punewrdmaharashtra.gov.in, eelmcd.punewrdmaharashtra.gov.in,
दूरध्वनी क्र. ०२०-२५४४०३८३, ०२०-२५४४०३९५

**ई-निविदा सूचना क्र.४ (द्वितीय मागणी) सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा द्वितीय मागणीसाठी मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाचे नाव: Supply of ANSYS MECHANICAL ENTERPRISE BUNDLE for Central Design Organisation Nashik (second call)

जिल्हा : पुणे
निविदेची किंमत रुपये : रु.२३६० / - (रुपये दोन हजार तीनशे साठ फक्त) (वस्तू सेवाकर सह)
ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०१/०७/२०२५ ते दिनांक ०८/०७/२०२५
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : ०९/०७/२०२५
काम पूर्ण करण्याचा कालावधी : ३० days of supply installation of softwares.

जा.क्र. प्रसंवि/५७९/२०२५
कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन, कोथरूड पुणे
दि. २०/०६/२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन, कोथरूड पुणे

**विमाका / पुणे / जाहि / ६१ / २०२५ - २०२६**



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ च्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.१७७/२०२५/११५८**

**अर्जदार**
युग्मस्मृती सहकारी गृहरचना संस्था मर्या.
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.१७७/२०२५/११५८
पत्ता: २७५, कसबा पेठ,पुणे- ४११ ०११.
तर्फे अध्यक्ष - श्री. दिलीप बबनराव धुमाळ

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. श्री. शेख आय. ए. प्रोप्रायटर युग्म प्रमोटर्स ॲन्ड बिल्डर्स
पत्ता ३५१ रास्ता पेठ पुणे- ४११ ०११
२. श्री. गिरीष विठ्ठलराव देशपांडे (मयत)
जमीन मालक यांचे कायदेशीर वारस व विद्यमान जमीन मालक
अ. श्रीमती बागेश्री गिरीष देशपांडे,
ब. कु. कोमल गिरीष देशपांडे,
क. कु. योगिता गिरीष देशपांडे,
ड.कु. अमित गिरीष देशपांडे,
रा.सिटी सर्व्हे नं.२७५ कसबा पेठ, पुणे ४११ ०११.

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या **युग्मस्मृती** सहकारी गृहरचना संस्था मर्या. २७५, कसबा पेठ, पुणे- ४११०११ या संस्थेचे **मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. १७७/२०२५** दाखल आहे. सदर अजार्ची सुनावणी **दिनांक १२/०६/२०२५** रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने **ॲड. ज्ञानेश्वर जामदार** हजर.

गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ ( अ, ब, क, ड ) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ (अ,ब,क,ड) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अजार्ची पुनश्च: **सुनावणी दिनांक ०३/०७/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ (अ,ब,क,ड) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक **२३/०६/२०२५** रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

सही/-
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे


# कला विश्व

## भारतात बंदी घालण्यात आलेला 'संतोष' हा फक्त चित्रपट नाही, हे व्यवस्थेचं अरण्यरुदन



सआदत हसन मंटो यांनी लिहिलेली एक 'बू' नावाची कथा आहे. या कथेत वेश्यागमन करणाऱ्या रणधीर नावाच्या तरुणाला एका 'घाटी' वेश्येच्या शरीराचा वास (बू) आवडतो. तो मग ती 'बू' शोधत अस्वस्थ होत राहतो. त्याचं लग्न होतं तरीही डोक्यातून, मनातून ती 'बू' जात नाहीं. त्या कथेत मंटो म्हणतात, उस बू में एक बदबू भी थी और खुशबू भी. अगदी त्याचं लग्न होतं तरीही रणधीर ती 'बू' परत मिळेल का? या शोधात राहतो. कथेचा हा संदर्भ आठवण्याचं कारण म्हणजे नुकताच पाहिलेला 'संतोष' नावाचा चित्रपट. संतोष सैनी या महिला कॉन्स्टेबलच्या आयुष्याभोवती फिरणारा हा चित्रपट. या चित्रपटात आपल्याला जात व्यवस्थेबाबत आणि धर्मांधतेबाबत मंटोंनी जे इतक्या वर्षांपूर्वी लिहून ठेवलंय तेच जाणवतं. अनेकांच्या डोक्यातून 'जात' गेलेली नाही. पोलीस आहोत म्हणून डोक्यात हवा जाते आणि मग हवं ते करु शकतो, वाटेल तसं सगळं काही वळवू शकतो ही मानसिकता यात अधोरेखित झाली आहे. पोलीस हे आपल्या समाजाचा एक अविभाज्य भाग आहेत. खरंतर आपल्या आयुष्याचाही. छोट्यातल्या छोटी घटना असो किंवा अगदी मोठा गुन्हा त्याची उकल करण्याचं काम पोलीस करत असतात. पोलिसांकडे कायद्याचे रक्षक म्हणूनच पाहिलं जातं. मात्र पोलिसी व्यवस्थेला जर जातव्यवस्थेची धर्मांधतेची कीड लागली असेल तर? असं पोलीस खरंच करत असतील का? का करत असतील? काय घडत असेल? या सगळ्याची उत्तरं आपल्याला 'संतोष' नावाच्या चित्रपटात मिळतात. शहाना गोस्वामीची प्रमुख भूमिका असलेला आणि संध्या धुरी यांचं दिग्दर्शन असलेला हा चित्रपट भारतात बॅन करण्यात आला आहे. मात्र 'संतोष' हे पोलिसी व्यवस्थेचं भयाण वास्तव आहे.

## भारताचं नुकसान, 'सरदारजी ३' वादाप्रकरणी जावेद अख्तरांचा दिलजीत दोसांझला पाठिंबा



आपल्या गायन आणि अभिनयामुळं चर्चेत असलेला अभिनेता दिलजीत दोसांझ एका वादात अडकला आहे. दिलजीतच्या आगामी 'सरदार जी ३' चित्रपटात पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमिर मुख्य भूमिकेत आहे. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. 'सरदारजी ३'चा ट्रेलर प्रदर्शित होताच दिलजीत दोसांझ पाकिस्तानी अभिनेत्रीबरोबर काम करत असल्याने कलाकारांसह नेटकरी त्याच्यावर टीका करत आहेत. 'सरदार जी ३' या चित्रपटावर बंदीही घालण्यात आली आहे. अशातच प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांनी या चित्रपटाबद्दल दिलजीतला पाठिंबा दिला आहे. इंडियन एक्स्प्रेसनुसार जावेद अख्तर याप्रकरणी म्हणाले, मला माहित नाही की चित्रपट नेमका कधी बनवला गेला आहे. पण जर दहशतवादी हल्ला होण्यापूर्वी चित्रपट पूर्ण झाला असेल; तर तो गरीब निर्माता काय करणार? नंतर काय होणार आहे, हे त्याला तेव्हा कसं कळणार होतं? यापुढे ते म्हणाले, या चित्रपटामुळे भारतीय निर्मात्यांचे पैसे बुडतील, पाकिस्तानचे नाही. भारतीय निर्मात्याला तोटा होईल. एखादा कायदा दहा वर्षांपूर्वीच्या परिस्थितीला लागू करू शकत नाही. जर त्या गरीब माणसाला असे काही घडणार आहे हे माहित असतं, तर त्याने पाकिस्तानी अभिनेत्रीची चित्रपटासाठी निवड केलीच नसती. मला वाटतं की, सरकार आणि सेन्सॉर बोर्डाने या प्रकरणाकडे सहानुभूतीने पाहावं. इम्तियाज अली यांनी असं म्हटलं, मी या विषयावर जास्त काही सांगू शकत नाही. पण मी दिलजीतला वैयक्तिकरित्या ओळखतो आणि मला माहित आहे की, त्याला देशभक्तीची जाणीव आहे. तुम्ही त्याच्या कार्यक्रमांत पाहिलं असेल, तर तो नेहमीच भारतीय ध्वज फडकावत शेवट करतो आणि हे तो मनापासून करतो. यात कोणताही आविर्भाव नाही. त्याला हे सर्व करण्यास कोणीही सांगितलं नाही.

# बँकिंग व्यवहाराबाबत विश्वासार्हता निर्माण करण्यात नागरी सहकारी बँकांची भूमिका महत्वाचीच : मुख्यमंत्री फडणवीस

## वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा रौप्य महोत्सव उत्साहात

जनप्रवास : प्रतिनिधी



नागपूर : नागरी सहकारी बँकांचे सर्वाधिक प्रमाण महाराष्ट्र व गुजरात राज्यात असून या बँकांनी राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. यासोबतच सर्वसामान्य नागरिकांमध्ये बँकिंग व्यवहाराबाबत विश्वासार्हता निर्माण करण्यातही नागरी सहकारी बँकांनी महत्वाची भूमिका बजावली असल्याचे गौरवोद्गार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले.

येथील वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी खासदार अजय संचेती, माजी आमदार सागर मेघे, पगारिया ग्रुपचे अध्यक्ष उज्वल पगारिया, वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अनिल पारख, उपाध्यक्ष अश्विन शहा व्यासपीठावर उपस्थित होते.

बहुतांशी व्यावसायिक बँका गुंतवणुकीसह इतर बाबींमध्ये अग्रेसर असतात परंतु देशाच्या आर्थिक विकासासाठी विविध प्राधान्यशील क्षेत्रात (प्रायॉरिटी सेक्टर) करण्यात येणाऱ्या कर्जपुरवठ्यात त्या मागे असतात, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, वर्धमान बँक स्थापनेपासूनच विविध निर्देशांक आणि मानकांच्या कसोटीवर उत्कृष्ट कार्य पार पाडत आहे. विशेषत: प्राधान्यशील क्षेत्रात प्रमाणावर कर्ज वाटप करूनही शून्य टक्के एनपीए असणाऱ्या व सातत्याने १५ टक्के लाभांश देणाऱ्या या बँकेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

वित्तीय संस्थांचे देशाच्या विकासात मोठे योगदान असल्याचे सांगून श्री.फडणवीस म्हणाले, जास्तीत जास्त वित्तीय संस्था स्थापित झालेल्या प्रदेशाची आर्थिक आणि भौतिक प्रगती जोमाने होते. या संस्था प्रगतीच्या मानक आणि विकासाच्या भागीदार ठरतात. या दृष्टीने वर्धमान बँकेने व्यावसायिकता जोपासतानाच कौशल्यपूर्ण कामकाजातून व्यावहारिकता सांभाळत चांगली वित्तीय व्यवस्था उभी केली. कर्जपुरवठ्याला प्राधान्य दिल्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाली असून बँकेचीही प्रगती झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

बँकिंग क्षेत्रात यापूर्वी मोठे बदल झाले तसेच काही नवी धोरणेही लागू झाली. मात्र अशा परिस्थितीतही आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करून सहकारी बँकांनी व्यावसायिकतेचा अवलंब करत नवीन परिस्थितीत स्वत:ला स्थापित केले. व्यावसायिक व राष्ट्रीय बँकांनादेखील ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी निर्माण झालेले तंत्रज्ञान स्वीकारण्यास अवधी लागला. मात्र त्या सर्व बाबी अर्बन बँकांनी गतीने स्वीकारून ग्राहककेंद्रित सेवा देण्यासाठी सर्व सुविधांची निर्मिती करण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला आहे. वर्धमान बँक केवळ बँकिंग क्षेत्रापुरती मर्यादित न राहता सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी पार पाडत असल्याचे ते म्हणाले.

श्री. फडणवीस यांनी वर्धमान बँकेच्या स्थापनेबाबतची आठवण यावेळी विषद केली. १९९९ मध्ये वर्धमान बँकेची स्थापना झाली व त्याच वर्षी ते विधानसभेत निवडून आले. बँकेची कारकीर्द आणि आपला विधिमंडळातील प्रवास या दोन्ही बाबींचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याचे सांगताना या संस्मरणीय घटनेबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

## एकल महिलांची सुरक्षा, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनासाठी धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक : उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यातील एकल महिलांसाठी सुरक्षा, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाबाबत धोरणात्मक उपाययोजना अंमलात आणणे आवश्यक आहे. यासाठी महसूल, अन्न व नागरी पुरवठा, महिला व बालविकास विभाग, आरोग्य, रोजगार हमी योजना आणि ग्रामविकास विभागामार्फत एकल महिलांचा डेटा संकलित करून, त्यांना प्राधान्यक्रम देणाऱ्या योजना राबवाव्यात असे निर्देश उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिले.

एकल महिलांच्या समस्या आणि उपाययोजना संदर्भात आज विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, महिला व बालविकास विभागाच्या आयुक्त नैना गुंडे, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला, उपायुक्त राहुल मोरे, आदिवासी विकास विभागाचे सह सचिव मच्छिंद्र शेळके, रोजगार हमी योजनेचे सह सचिव अतुल कोदे, साऊ एकल महिला पुनर्वसन समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, सदस्य मिलिंद साळवे उपस्थित होते.

उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे म्हणाल्या, विधवा , घटस्फोटित, परित्यक्त्या, अविवाहित अशा एकल महिलांना सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्वाचा असून, आत्मसन्मान, स्वाभिमान, कायदेशीर जागृती, मालमत्ता स्वातंत्र्य याबाबत ठोस उपाययोजना राबविण्यात यावी.

शाश्वत विकास उद्दीष्टांवर काम करणे आवश्यक आहे. यासाठी महिलांना विविध योजनेचा लाभ देणाऱ्या विविध शासकीय विभागांशी समन्वय साधून एकल महिलांची माहिती संकलीत करण्यात यावी. याआधारे एकल महिलांना प्राधान्याने विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यासंदर्भात पालक सचिव आणि संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत अभियान राबविण्यासंदर्भात उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सुचना दिल्या. त्यांना ओळखपत्र दिल्यास पोलीस स्थानकामार्फत सुरक्षा आणि रूग्णालयात वैद्यकीय सुविधा प्राधान्याने देणे सुलभ होणार आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या मालमत्तेचे जबरदस्तीने हस्तांतरण होऊ नये यासाठीही उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

## मातंग समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क जेईई, नीट प्रशिक्षणाकरिता नोंदणीचे आवाहन

जनप्रवास : प्रतिनिधी

JEE (Main)

मुंबई : अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (आर्टी) वतीने राज्यातील अनुसूचित जातीतील मातंग व इतर तत्सम समाजातील पात्र उमेदवारांसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) प्रवेश परीक्षांचे नि: शुल्क अनिवासी ऑफलाईन प्रशिक्षण खाजगी व नामांकित संस्थांमार्फत दिले जाणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र असतील.

त्याकरीता मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील जे उमेदवार सन- २०२५ ची इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, अशा उमेदवारांचे सन २०२५ ते मे २०२७ या कालावधीसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. या प्रशिक्षणासाठी १० वीच्या गुणांच्या आधारे व ८ लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे निवड केली जाईल. त्याकरीता इच्छुक व पात्र उमेदवारांनी १ जुलै पासून ३० जुलै २०२५ पर्यंत https://cpetp.barti.in या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे.

## नाशिकमध्ये कुंभमेळा प्राधिकरणाला सर्वाधिकार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई: नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे भरणाऱ्या कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणास राज्य सरकारने सर्वाधिकार दिले असून पुढील तीन वर्षे नाशिक जिल्ह्यात याच प्राधिकरणाची मक्तेदारी राहणार आहे. नाशिक महापालिका, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद आणि विभागीय आयुक्त अशा सर्वच सरकारी, निमसरकारी कार्यालयांना प्राधिकरणाचा आदेश पाळावा लागणार आहे.

कुंभमेळा हा एक महत्वाचा धार्मिक मेळावा नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांमध्ये आणि इतर क्षेत्रांमध्ये दर बारा वर्षांमधून एकदा आयोजित केला जातो. साधू व महंत यांच्यासह विविध धार्मिक व सामाजिक संघटना तसेच राज्यसरकार यांच्या परस्पर सहकार्यातून कुंभमेळा आयोजित केला जातो. नाशिकमध्ये ३१ ऑक्टोबर २०२६ ते २४ जुलै २०२८ दरम्यान कुंभमेळा होणार असून त्यात ४२ ते ४५ पर्वस्थान होणार आहेत. यापूर्वी२०१५ मध्ये पार पडलेल्या कुंभमेळ्यास सुमारे दोन कोटी, पन्नास लाख भाविकांनी सहभाग घेतला होता.

त्यामुळे आगामी कुंभमेळ्यास उपस्थित राहणाऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने, व्यवस्थापनासमोर प्रचंड आव्हाने निर्माण होऊ शकतात. म्हणून साधू, महंत, यात्रेकरू, पर्यटक व स्थानिक रहिवासी यांच्यासह सहभागी होणाऱ्यां सर्वांना सुविधा पुरविण्याच्या आणि अध्यात्मिक व पर्यटनविषयक अनुभूतीची परिपूर्तता करणारे सुरक्षित, संरक्षित व दुर्घटनामुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने कुंभमेळ्याचे सुरळीत आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

कुंभमेळा आयोजित केला जाणाऱ्या उत्तर प्रदेश, उत्तराखंड व मध्यप्रदेश राज्यांच्या धर्तीवर हे प्राधिकरण आणि त्यासाठीचा कायदा तयार करण्यात आला असून विधिमंडळाच्या सोमवारपासून सुरु होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात याबाबतचे विधेयक संमत केले जाणार असल्याची माहिती नगरविकास विभागातील सूत्रांनी दिली.

## उद्धव ठाकरे सेनेला नागपुरात भगदाड; अनेक माजी नगरसेवक, पदाधिकारी शिंदे सेनेत

जनप्रवास : प्रतिनिधी

नागपूर : राज्यभरात उद्धव ठाकरे सेनेला शिंदे सेनेकडून मोठा दणका दिला जात आहे. अनेक मोठे पदाधिकारी ठाकरे गट सोडून शिंदे गटात सहभागी होत आहेत. नागपुरातील अनेक माजी नगरसेवक,माजी शहरप्रमुखांसह पूर्व विदर्भातील जिल्हाप्रमुख व इतरही पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री शिंदेच्या उपस्थितीत शनिवारला पक्षात प्रवेश केला.

नागपुरातील माजी नगरसेवक अजय दलाल, माजी नगरसेविका अल्का दलाल, परसराम बोकडे, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख रोहित मिश्रा, गडचिरोलीचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र चंदेल, माजी शहर प्रमुख राजू तुमसरे, काँग्रेसचे राजेश कुंभलकर, रवी गाडगे, वसीम कलाम, राष्ट्रवादीचे इब्राहीमभाई झाडीया. चित्रपट कलावंत संजय ठाकरे, ग्रामीण मनसेचे जिल्हाध्यक्ष विजय किनकर, विद्युत कर्मचारी संघटनेचे अनेक पदाधिकारी,एआयएमआयचे जिल्हाध्यक्ष सोहेल अहमद, कारंजाचे माजी शिक्षण सभापती सतीश इंगळे, शिक्षक सेनेचे प्रकाश नाईक, विजय लिचडे, आनंद शर्मा, गणेश रामटेके, अ.भा. परीवार पार्टीचे अरवींद सुरोशे, पुलगावचे जय दोराईस्वामी, आर्वीचे राष्ट्रवादी शहराध्यक्ष संजय कामडे आदी प्रमुखांचा समावेश आहे.

दरम्यान, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कार्यकर्त्यांना सवंगडी समजायचे. काहींनी कार्यकर्त्यांना घरगडी समजायला लागले. हे सर्व अस्वस्थ करणारे होते. त्यामुळे माझ्या शब्दावर विश्वास ठेवून ५० आमदार सोबत आले. आज शिल्लक शिवसेना उरली का? अशी विचारणा करीत शिंदे गटाचे प्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. भंडारा येथील कार्यक्रम आटोपून आल्यावर विमानतळाजवळील मेट्रोरेल्वे सभागृहात पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते शनिवारी बोलत होते.

## सारथी संस्थेच्या कामाला निधी कमी पडू दिला जाणार नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार

**सारथीच्या युपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार**

जनप्रवास : प्रतिनिधी





पुणे : सारथी संस्थेच्या कामाला गती देण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत असून त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. ही संस्था नवीन असून या संस्थेच्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होण्यासाठी सारथीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी येणाऱ्या काळात सामाजिक जबाबदारी म्हणून नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) या संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात युपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास सारथीचे संचालक उमाकांत दांगट, मधुकर कोकाटे, डॉ. नवनाथ पालकर, किशोरराजे निंबाळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिवाजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. पवार पुढे म्हणाले, युपीएससी व एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रशासनात काम करताना लोकाभिमूख काम करुन, समाजातील दुर्बल व वंचित घटकांना मदत करावी. या कामात सातत्य ठेऊन संस्थेचा नावलौकीक वाढवा. सारथी ही संस्था राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने कार्यरत असून, त्यांच्या नावाला साजेसे असे काम उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराने संस्थेची वाटचाल सुरू असून संस्थेचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे. संस्थेच्या माध्यमातून आपणास जे यश मिळाले आहे, त्या यशाचे अनुभव इतरांना सांगून, सारथीच्या माध्यमातून पुढील विद्यार्थ्यांना समर्पक भावनेतून मदत करावी, असे आवाहन श्री. पवार यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य क्रांतीकारी असून ते विसरता येणार नाही. देशात अशा प्रकारची एकही सामाजिक संस्था नाही, जिच्या उद्दिष्टांमध्ये छत्रपती शाहू महाराजांचा विचार नाही. सामाजिक क्षेत्रात प्रत्येक संस्था व संघटना ही राजर्षी शाहू महाराजांचा विचार घेऊनच पुढे जाते किंवा जाऊ शकते, असे मत व्यक्त करुन राज्यातील शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्था या सर्वांच्या कार्याचा आदर्श हे राजर्षी छत्रपती शाहू महाराजच आहेत, असे श्री. पवार यांनी सांगितले.

सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर आपल्या मनोगतात म्हणाले, महाराष्ट्रात १९८० च्या दशकात युपीएससी व एमपीएससी मध्ये निवड होण्याचे प्रमाण हे नगण्य होते.




* संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com